
# श्रीसाईलीला



स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडी
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

**ई. आर. मालपेकर**

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. २९६३१



# श्री सा ई वा क्सु धा

## श्रीसाईलीला

अंतकाळीं, तुम्हांला ज्याची आठवण होईल तेंच पुनर्जन्मांत तुमच्या नशिबीं येईल. यासाठीं अंतकाळीं आठवण व्हावी ती भगवंताची त्यामुळें पुनर्जन्मांतून तुमची सुटका होईल. त्यासाठीं नामस्मरणाचा अभ्यास सतत असावा. उठतां बसतां नामस्मरण. मग शेवटच्या घडीला त्याची आठवण झाल्याशिवाय रहाणार नाहीं. नाहींतर अंतकाळीं माणूस गांगरून जातो. बेभान होतो. तसें होऊं नये. आयुष्यभर आपण जागे राहिलों आणि अंतकाळीं जर आपण झोंपी गेलों तर त्याचा काय बरें उपयोग ? त्यासाठीं भगवंताच्या नांवाचा व सत्संगाचा सहवास सतत असावा.

—श्रीसाईसच्चरित्


[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४४ वें ] जून १९६५ [ अंक ३ रा

: संपादक :

श्री. बी. जी. पोतनीस

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६३३६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०, बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

मनुष्याच्या वाट्याला येणारें किंवा जें परमसुख आपणास लाभावें म्हणून झटावयाचें असतें ते सर्वश्रेष्ठ सुख म्हणजे आत्मसाक्षात्कार हेंच होय. त्याची प्राप्ति झाल्यानंतर या जगांत मिळवावयाचें किंवा ज्याच्यासाठीं धडपडायचें असें कांहींहि शिल्लक रहात नाहीं.

हें खरें असलें तरी आत्मसाक्षात्काराची प्राप्ति ही साधीसुधी का गोष्ट आहे? त्यासाठीं कितीतरी तापत्रयांतून जावें लागत असतें. कोणत्याहि सुखाचा लाभ करून देणारी गोष्ट असो, ती मिळवायची तर त्यासाठीं अहोरात्र झटून उद्योग करणें प्राप्त असतें आणि मग ज्याची गणना सर्वश्रेष्ठ किंवा परमोच्च सुखांत करण्यांत आली आहे, त्यासाठीं किती खडतर तपश्चर्या करावी लागत असेल याची कल्पनाही करणें कठीण आहे.

त्या सुखाला 'परमार्थ' असें म्हटलें आहे. त्याचा अर्थच हा कीं, ती वस्तु प्राप्त झाल्यानंतर दुसऱ्या कोणत्याही वस्तूच्या प्राप्तीची जरूरीच रहात नाहीं. मग दुसऱ्या कसल्याही गोष्टीची मनांत इच्छाच उत्पन्न होणार नाहीं. ईश्वरी साक्षात्कार ज्याच्या वाट्यास आला त्याला दुसऱ्या कशाची जरूरी भासणार आहे? तें सुख त्याला पुरून उरणारें दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीची गरज न भासविणारें असेंच असणार!

ईश्वरानें माणसाला इंद्रियें दिलीं आहेत. त्यांची जाणीव झाली म्हणजे त्याला विषयांचें ज्ञान होऊं लागतें. नंतर मन व बुद्धि यांची त्याला जाणीव होऊं लागते. यांचे व्यापार मग सुरु होऊं लागतात. त्यांत धक्केबुक्के खावे लागतात. द्यावे लागतात. मनुष्य अनुभवानें आस्ते आस्ते शहाणा होऊं लागतो. आणि हें शहाणपण त्याला देवाची आठवण करून देत असतें.

मनुष्याचा हृदयस्थ आत्मा आपल्या जागींच असतो. परंतु त्याची जाणीव व्हावी लागते व त्याची ओळख पटावी लागते. अगदीं जवळांत जवळ असूनहि अज्ञान पटलांमुळें त्याच्यावर पडद्यांवर पडदे ओढले गेलेले असतात. ते पडदे दूर सारण्याची व पडद्याआड कांय लपून राहिलें आहे हें दिव्य दृष्टि संपादन करून पहाण्याची जरूरी असते.

आत्मसाक्षत्काराचें वर्णन करून सांगतां येण्यासारखें नाहीं. आजवर तें कुणालाही साधलेलें नाहीं. नाहीं वेदांना, नाहीं श्रुतींना. हें ज्ञान साधुसंतांना झालेलें असतें. त्यांच्या सहकारानें तें आपण संपादन करावयाचें असतें.

या परमस्वरूपाची, आत्मस्वरूपाची ओळख कशी करून घ्यावी, तेथपर्यंत पोहोंचण्याचा प्रवास कशा रीतीनें करावा, हें त्या सुखाची प्राप्ति करून घेतली त्यांनीं परोपरीनें सांगून ठेविलें आहे. त्या मार्गानें आपण जावयाचें आहे.

जेथून परम सुखाचा, परमार्थाचा किंवा आत्मसाक्षात्काराचा लाभ होतो तेथपर्यंत तुम्हांला पोहोंचायचें आहे ना ? पण पहा ! त्या राजवाड्यांच्या दरवाजावर रक्षक, द्वारपाल सदैव खडे आहेत. ते तुम्हांला आंत जायला प्रतिबंध करीत असतात. इंद्रियद्वारा मिळणाऱ्या सुखोपभोगांत तुम्हीं जोंपर्यंत रममाण होऊन रहाल तोंपर्यंत त्या राजवाड्याचा दरवाजा जरासुद्धां खुला होणार नाहीं. ते द्वारपाल म्हणजे तुमची इंद्रियें न होत. त्यांच्यावर काबू मिळविण्याचा, इंद्रियनिग्रहाचा तुम्हीं कसून प्रयत्न केला पाहिजे. आणि त्यांत यश मिळविलें पाहिजे.

हें यश तुम्हीं मिळविलें म्हणजे त्या राजवाड्यांत प्रवेश करण्याचा व तेथील राजाधिराजाला डोळे भरून पहाण्याचा हक्क तुम्हांला प्राप्त होतो. एरवीं नाहीं.

महाकठीण आहे बुवा उद्योग ! म्हणून का तो सोडून द्यायचा ? त्याला चिकटलें पाहिजे. तो उद्योग अविरत, अहोरात्र व झटून आरंभिला पाहिजे. जो झटून, तळमळपूर्वक व श्रद्धापूर्वक उद्योग करतो, त्या उद्योगांत त्याला यश मिळालेंच पाहिजे. मग तो उद्योग कोणताहि असो.

तुम्हांला दुःखतापापासून मुक्त व्हावयाचें आहे ना ? की जन्मोजन्मीं याच संसारचक्रांत गुरफटत राहून गिरक्या खात जीवन घालवायचें आहे ? आंधळ्याप्रमाणें वागूं नका.

तुम्हांला ज्याची प्राप्ति करून घ्यायची आहे तें परमतत्त्व, तो परमात्मा तुमच्याच ठायीं आहे. तुमच्यासमोर जीं जीं माणसें दिसतात त्यांच्या ठायींहि त्याची वस्ती आहे. तुम्ही आणि ते भिन्न नाहीं. एकच आहांत हें एकत्वाचें ज्ञान होणें, सर्वांभूतीं परमेश्वर पहाण्याची प्राप्ति होणें याचेंच नांव आत्मसाक्षात्कार !

त्याची अनुभूति होईपर्यंत आपण अविरत व श्रद्धापूर्वक प्रयत्नशील रहावयाचें आहे एवढी जाणीव जरी आमच्या ठायीं निर्माण झाली तरी आमचें भाग्य उदयाला आलें असें म्हणतां येईल.

बाबांच्या कृपाप्रसादानें तेवढें भाग्य तुमच्या आमच्या वांट्याला येवो, हीच त्यांच्या चरणीं अनन्यभावें प्रार्थना.

—संपादक

# प्रगतीचीं दोन चाकें

**मनुष्य सतत प्रगतीच्या मार्गानें वाटचाल करीत गेला पाहिजे. प्रगती होण्याचीं प्रमूख साधनें दोन आहेत. एक सतत उद्योगांत रहाणें व दुसरें नेहमीं प्रगतीशील, धार्मिक व अध्यात्मिक विचारांचें चिंतन करणें.**

सदासर्वकाळ कांहीं ना कांहीं उपयुक्त कामांत गढून राहिल्यानें नानाप्रकारच्या अनुभवांचें भांडार आपल्यापाशीं जमा होत असतें; तसेंच चांगल्या गोष्टींचें चिंतन करीत राहिल्यानें मनांत घाणेरडे विचार साचत नाहींत. सद्भावनांचें वास्तव्य सुखकारक असतें.

प्रत्येक मनुष्याच्याठायीं अपरंपार सामर्थ्य वास करीत असतें. आध्यात्मिक चिंतनामुळें त्या गोष्टीची तुम्हांला जाणीव होऊं लागते. तुमचा आत्मविश्वास त्यामुळें वाढीला लागतो.

## चिंतनशील बना

आत्मविश्वास हा तुमची उन्नती करणारा आहे. तेव्हां कार्य करीत रहाणें व चिंतनशील बनणें या दोन्हीं गोष्टीं फार महत्त्वाच्या आहेत. काम करीत राहाणें व चिंतनशील बनणें याचा अर्थ काय? त्यामुळें तुमच्या ज्ञानांत भर पडत असते. कर्म व ज्ञान हे माणसाचे दोन पंख आहेत म्हणा ना. त्यांच्या साहाय्यानें या जगांत आपण गरुड भराऱ्या मारावयाच्या असतात. केवळ एकाची कास धरून भागणार नाहीं. दोन्हींचा सहकार आपण संपादन करून घेतला पाहिजे.

कर्म व ज्ञान यांची सांगड बरोबर घालतां आली पाहिजे. एक कमी एक जास्त अशा विषम स्थितींत तुम्हीं आपला मानसिक समतोल गमावून बसाल.

सदासर्वकाळ आपल्या कामात गुंतून राहिल्यानें माणसाचें जीवन एकांगी होतें. दिवसापोटीं थोडा वेळ ईशचिंतनासाठीं राखून ठेऊन त्या वेळांत आपण चिंतन केलें पाहिजे. तसें नाहीं केलें तर तुमचें जिणें निर्जीव होईल. अध्यात्मभाव तुमच्या उन्नतीला पोषक असल्यामुळें त्याच्याशीं फारखत करून चालणार नाहीं.

## तुमचा उद्योग

तुम्हीं कोणत्याहि उद्योगांत असा. तो उद्योग सचोटीनें व मन लावून करा. हें कार्य त्यानें—भगवंतानें माझ्यावर सोंपविलें आहे या भावनेनें तें तन्मयतेनें पार पाडण्यासाठीं झटा.

वर सांगितल्याप्रमाणें केवळ तुमच्या हातांतील कार्य किंवा केवळ ज्ञान संपादन तुमच्या उन्नतीस कारण होणार नाहीं. कामाची आणि ज्ञानाची बरोबर सांगड घालतां आली पाहिजे. उद्योगाशिवाय तुमच्याठायीं असलेल्या शक्तीचा विकास होणार नाहीं. उद्योगाशिवाय या जगांत तुम्हीं पैसा जवळ करूं शकणार नाहीं.

## पैसा तर पाहिजेच

पैसा या जगांत अत्यंत महत्त्वाचें स्थान पकडून राहिला आहे. तो तुमच्यापाशीं नाहीं तर तुमचा जन्म व्यर्थ. त्या पैशांचा सदुपयोग करणें ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. पैसा मिळवायचा, उद्योगाच्या बळावर मुबलक पैसा मिळवायचा तो कशासाठीं ? लोककल्याणासाठीं गरजवंतांच्या गरजा दूर करण्यासाठीं व सत्कार्याला हातभार लावण्यासाठीं.

देवानें संपदा दिली ती कशासाठीं ? स्वतःच्या चैनीखातर उधळण्यासाठीं ! नाहीं. तिचा दानधर्मात सदुपयोग करून पुण्य संचय करण्यासाठीं.

तुम्हीं कोणत्याही उद्योगांत असा तुमच्या मार्गांत कांहीं ना कांहीं अडचणी कधीं ना कधीं यायच्याच. परंतु जर तुम्हांला अध्यात्मिक चिंतनाची मातब्बरी समजली असेल तर तुम्हीं कधींही गांगरून जाणार नाहीं तो पाठीराखा आहे. तोच मार्ग दाखवील व संकट पार करील असा आत्मविश्वास तुमच्याठायीं असल्यावर त्या श्रद्धेच्या बळावर तुम्हीं आलेल्या संकटांना बगल देऊन पुढें जाल.

## भीती बाळगूं नका

कोणतीही परिस्थिती येवो. तुम्हीं भीतीनें गांगरून जाता कामा नये. भीती हें मरण आहे. तेव्हां भयाच्या तावडींत कधींहि सांपडूं नका. आणि भय कोणाच्या वाट्याला जात नाहीं ? जो चिंतनशील आहे व श्रद्धाशील आहे त्याच्या. देवाच्या कृपेनें आलेल्या अडचणींतून मी पार पडणारच अशी तुमची श्रद्धा असली पाहिजे.

मी दिलें, मी अमक्यावर उपकार केलें ही भावना अहंकाराची वाढ करणारी आहे. त्या भावनेच्या आहारीं तुम्हीं कधींही जाऊं नका. जें दिलें, केलें तें कृष्णार्पण समजून नेहमीं पुढें पाऊल टाकीत जा. तो कर्ता करविता, तो सुबुद्धि देणारा. मी कोणी नाहीं. मी त्याच्या हातांतील केवळ एक खेळणें आहे, या भावनेनें नेहमीं वागत गेल्यानें तुमच्या अंतःकरणास अहंकाराची बाधा होणार नाहीं.



# दोष पाहूं नका

—लेखक आप्पाराव

दोष कोणांत नसतात? परंतु ते झिजवीत रहाणें, त्यांची बसतां उठतां घोषणा करणें हें अत्यंत हानिकारक आहे. आपण कोणाच्याहि ठायीं असलेल्या दोषांची कधींहि चर्चा करण्याच्या व्यापांत पडूं नये. तसेंच कान टवकारून दुसऱ्यांचे दोष ऐकणें, त्यांत रस घेणें, त्यांत भर घालण्याचा नाहक प्रयत्न करणें हें फार वाईट. तो विचार आपल्या मनाला कधींहि शिवूं नये. कशाला त्या नसत्या उठाठेवी! दुसऱ्यांच्या ठायीं असलेल्या दुर्गुणांचें किंवा अवगुणांचें चर्वितचर्वण करण्यांत आपण लक्ष घालणें, हें फार हानिकारक. त्यामुळें आपलें अंतःकरण मलीन होतें. कारण आपलें अंतःकरण हें एक शेतच आहे. त्यावर आपण जशा प्रकारचें बीं पेराल तशा प्रकारचें पीक आपण घ्याल. आपल्या मनांत दुष्ट विचारांना कधींहि थारा मिळूं नये. तो मळ आपल्या मनाला. कधींहि चिकटूं नये. तें एकप्रकारें आपलें पतनच होय. चांगले विचार मनांत घोळवावें. त्यामुळें आपलें कल्याण होणार आहे,

## दोष उगाळूं नका

दुसऱ्यांचे दोष उगाळून तुम्हांला काय मिळणार? दुसऱ्यांची निंदा, नालस्ती केल्यानें तुमचा कोणता फायदा होणार आहे? नुकसान मात्र निश्चित होईल! मग कशाला त्या फंदांत पडायचें?

आपण दुसऱ्यांचें दोष शोधूं लागलों म्हणजे त्यांच्याबद्दल मनांत तिरस्कार उत्पन्न होतो व स्वतःबद्दल नसता अभिमान जागा होऊं लागतो. दुसऱ्यांची निंदा केल्यानें किंवा ती ऐकत बसल्यानें त्याच्या मनाला दुःखताप नाहीं का होत? हें पाप आपण जाणूनबुजून कां म्हणून पदरांत घ्यावें.

पाप करणारा माणूस रहातो बाजूला; परंतु त्या पापाची चर्चा करण्यांत भाग घेणाराही पापी ठरतो. त्या पापी संस्काराचीं पुटें त्याच्यावर न समजतां चढविलीं जातात.

काय होतें पहा! दुसऱ्यांच्या दोषांची चर्चा केल्यानें आपली वाणी, ऐकल्यानें कान, त्यांचें दर्शन घडल्यानें डोळे व त्यांचें चिंतन केल्यानें मन व बुद्धि हीं सारीं दूषीत होतात आणि त्या माणसाचें पतन व्हायला मग फारसा वेळ लागत नाहीं.

असें पहा कीं, घाण ही जेथें लागते तेथील जागा अपवित्र बनते. तिला गलि-

च्छता प्राप्त होते. त्याचप्रमाणें निंदा दोष यांचें चर्वित चर्वण केल्यानें ती घाण त्या माणसाला चिकटल्याशिवाय कशी बरें राहील ?

## निंदा नालस्ती नको

तेव्हां ज्याला सरळ मार्गानें जायचें आहे ज्याला साधकाची पवित्र भूमिका सजवायची आहे त्यानें दोष दर्शन, दोष प्रदर्शन, निंदा नालस्ती यांच्या वाऱ्यालाही उभे रहतां कामा नये.

नीच हलकट पापी माणसाचा सहवास हा जसा हानिकारक त्याचप्रमाणें दुसऱ्यांच्या ठायीं असलेल्या दोषांची चर्चा करणें दुसऱ्यांची निंदा—नालस्ती करणें हेंही फार वाईट. जो दुसऱ्यांची निंदा करण्यांत आनंद व समाधान मानतो त्याचा सहवास आपण टाळला पाहिजे. कारण मग त्याच्या विचारांचा पगडा आस्ते आस्ते आपल्या मनावर बसल्याशिवाय रहाणार नाहीं. न समजतां आपल्या मनावर त्या विचारांचा पगडा बसत जातो, यासाठीं तशा मनुष्याच्या सहवासांत आपण कधींही येतां कामा नये.

## सद्गुणांकडे लक्ष पुरवा

आपण गुणग्राही बनलें पाहिजे. दुसऱ्यांच्या गुणांवर मोहीत होऊन त्याची चर्चा करण्यांत आनंद मानिला पाहिजे. दोषांची चर्चा नको. निंदेची कांस धरूं या नको. जें जें चांगलें दिसेल तें आपण घेऊंया. त्याची चर्चा करूं या. तीच आपणाला पोषक व तारक होऊन रहाणारी आहे.

दुसऱ्याचे गुण आपण टिपावे. त्याचें अनुकरण व मनन करण्यांत आनंद मानावा. त्यामुळें आपणही गुणी होण्याच्या मार्गाला लागतों.

प्रत्येक माणसांत कांहींना कांहीं गुण—दोष हे असतातच. आपण गुण तेवढे ध्यावे, ते उगाळावे, त्याचें चिंतन करावें, त्यांतच तुमचें कल्याण आहे, दोष उगाळण्यांत. दुसऱ्याची निंदा करण्यांत आपलें अकल्याण आहे ही गोष्ट ज्या दिवशीं मनाला पटेल तो दिवस भाग्याचा समजावा.

## आपलें व्रत एकच

दोष दृष्टीआड करायचे व गुण तेवढे ध्यायचे हें आपलें व्रत असावें. जे दोष तुम्हीं उगाळीत बसाल ते तुम्हांला चिकटतील व तुम्हीं त्यांत नाहक बुडून जाल व आपल्या जन्माचें मातेरें करून घ्याल, तेव्हां हें समजून घेऊन तुम्हीं दोष दाखविण्याच्या व निंदानालस्ती करण्याच्या फंदांत कधींहि पडूं नका. तुम्हीं सुखी होण्याचा हा एक मार्ग आहे.

# स्वतःचें सामर्थ्य ओळखा

*******************************

ईश्वरानें माणसाला अमाप शक्ति दिलेली आहे; परंतु तिची जाणीव फार थोड्यांना झालेली असते. स्वतःचे सामर्थ्य न अजमावतां आम्हीं आमचे जीवन कसें तरी आळसांत घालवीत असतों. एखादें काम आमच्यावर सोपविण्यांत आलें, किंवा एखादें कार्य आम्हीं करण्यासाठीं पुढें सरसावलों तर त्याच्या सिद्धीसाठीं जे शिकस्तीचें प्रयत्न करण्यांत आलें पाहिजेत ते आम्हीं करीत नाहीं. आणि निराशेनें तें कार्य आम्हीं अर्ध्यावर सोडून देतों किंवा कसेंबसें उरकून मोकळे होतों. त्यांत आम्हीं सारें अंतःकरण ओतलें पाहिजे; तें कांहीं आमच्याकडून घडत नाहीं.

## आजचे विद्यार्थी

विद्यार्थी वर्गाकडे जरा पहा ! त्यानीं मन लावून अभ्यास करावयाचा; भावी यशस्वी जीवनाची सारी मदार अभ्यास मन लपवून परिक्षांत उत्तीर्ण होण्यावर अवलंबून आहे, आमचें सुख दुःख त्याच्याशीं निगडीत झालेलें आहे, याची जाणीव कितीजणांस असते बरें ? बहुसंख्य विद्यार्थी खेळण्यांत, गप्पा मारण्यांत, फॅशन करण्यांत किंवा दुसऱ्या नाना प्रकारच्या ढंगांत आपला वेळ कसाबसा घालवितात. आणि शेवटीं वर्षअखेर परीक्षेंत नापास होऊन शिक्षणाला रामराम ठोकून मोकळे होतात.

त्याऐवजीं, त्या वयांत मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन तें जर मन लावून अभ्यास करतील तर डॉक्टर, इंजिनीयर, वकील किंवा आणखी कोणीतरी होऊन त्यांच्या जीवनाला किती सुंदर वळण लागण्याची शक्यता असते नाहीं का ? त्यांना स्वतःचें, कुटुंबाचें व समाजाचें वैभव वाढवून देशाच्या व जनतेच्या उपयोगी पडण्याचें भाग्य लाभणार नाहीं का ?

एकदां हातची संधि गेली म्हणजे ती परत येणें कठीण असतें. त्या त्या वयांत जी संधि मिळेल, त्या वेळेपुरतें आपलें जें कर्तव्य असेल तें पार पाडण्यासाठीं आपण मनापासून झटले पाहिजे.

## सामर्थ्याची जाणीव

आपल्याठायीं वाटेल तें होण्यासाठीं जरूर लागणारी शक्ति आहे. आपण ती जागविली पाहिजे. तिची जाणीव बाळगली पाहिजे. तिच्याकडून कार्य करवून घेतलें पाहिजे.

हें अगदीं सार्वभौम तत्त्व आहे. जो काम न करतां आळसांत वेळ दडवतो, उगाच मामुली श्रम करून तेवढ्यावर समाधान मानून रहातो, त्याच्या वाट्यास सुखा-समाधानाचें जीवन येणें शक्य नाहीं तो आपली आयुष्यनौका कशीबशी ढकलील !

परंतु हें जीवन झालें का ? जीवन कसें धगधगीत, प्रफुल्लित असावें. आळशी, जीवन सुखी कधींही होऊं शकत नाहीं, आपण उद्योग करून खूप कमाई करावी. स्वतः सुखी होऊन दुसऱ्यांच्या सुखांतही भर घालावी.

## पूर्वीचे आणि आजचे लोक

पूर्वीच्या काळीं साधनें पुरेशीं नव्हतीं. मार्गांत अडचणी अपरंपार होत्या. तरी महाउद्योगाच्या बळावर त्या काळांतील माणसें जगाला थक्क करून सोडणारीं कृत्यें करून आपलें नांव अजरामर करून ठेवीत होती. आज साधनसामुग्री अपरंपार वाढली आहे. माणूस अधिक शहाणा, अधिक ज्ञानी बनत आहे.

सारें कांहीं मानण्यावर अवलंबून आहे. मी सामर्थ्यसंपन्न आहे, मी काय वाटेल तें करूं शकेन, या जगांत अशक्य असें मला कांही नाहीं, ईश्वर माझा पाठीराखा आहे, तो मला अंतर देणार नाहीं. त्या श्रद्धेच्या बळावर मी वाटेल ती उलथापालथ करूं शकेन ही भावना ज्याच्या अंतःकरणांत दृढ झाली आहे तो कोणत्याही परिस्थितींत न डगमगतां नेहमीं पुढें पाऊल टाकीत जाईल.

## श्रद्धेचें सामर्थ्य

सर्व कांहीं मानण्यावर अवलंबून आहे. आम्हीं कांहीं मानीत नाहीं. आमचा नाहीं स्वतःवर व नाहीं देवाधर्मावर विश्वास ! श्रद्धा ही काय शक्ति आहे यांची आम्हांला जाणीवच झालेली नाहीं.

आयुष्य ईश्वरानें दिलें आहे म्हणून तें कसेंबसें रेटीत न्यावयाचें. यापलिकडे दुसरें कांहीं नाहीं.

तुम्हीं स्वतःला कमी मानूं नका; आणि आळसांत वेळ घालवूं नका. सदासर्वकाळ कांहीं ना कांहीं करीत रहा. मी मानव आहे. या जगांत पूर्वीच्या काळीं मानव प्राण्यानें नाना चमत्कार व पराक्रम करून दाखविले आहेत. मीहि मानव आहे. चतुष्पाद जनावर नाहीं. मलाहि देवानें मन, बुद्धि व शक्ति दिली आहे. त्यांच्या बळावर मीहि मनांत आणीन तो पुरुषार्थ करून दाखवीन. मी ईश्वरी अंश आहे. ईश्वराच्याठायीं ज्या ज्या बहुमोल गुणांचें अधिष्ठान कल्पिलें जातें, ते गुण मी संपादन करणार, मी देवाचा व जनतेचा लाडका होणार, अशी हिंमत तुम्हीं कां बरें बाळगूं नये ?

तुम्हीं कोण होऊं इच्छितां ? मालक कीं, नोकर ? बड्यांत बडा अधिकारी कीं, साधा शिपाई ? तुम्हीं सतत उद्योग करीत राहिलां, मोठे होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून त्या उद्योगास लागलां तर तुम्हीं कां मोठे होणार नाहीं ? महत्त्वाकांक्षा बाळगा. जिद्दीनें उद्योगास लागा. यश तुम्हाला मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं.

## जगांत वहावा होईल

तुम्हीं स्वतःला लहान–सहान समजूं नका. तुमच्याठायीं ईश्वरानें अपरंपार सामर्थ्य ठेविलें आहे. तुम्हांला त्याची दाद नाहीं, त्याची दखल तुम्हीं कधीं घेतली नाहीं. हातीं घेतलेल्या कामांत आपलें सारें अंतःकरण ओता. त्याच्याशीं एकतान व्हा. त्यांत शंभर टक्के यश मिळवा. जगांत सर्वांकडून तुमची वाहवा होईल. लोक तुम्हांला खांद्यावर घेऊन नाचतील.


थोर पुरुष होऊन गेले व आजहीं हयात आहेत. त्यांचें जीवन जरा निरखून तर पहा. त्यांनीं उन्नतीचा मार्ग कसा आक्रमण केला व शिखर त्यांनीं कसें गाठलें हें जरा तपासून पहा.

जें एकानें केलें तें दुसऱ्यालाही कां करतां येऊं नये ? जरूर करतां येईल. आम्हीं स्वतःच्या सामर्थ्यावर व कर्तृत्वावर विश्वास ठेविला पाहिजे. हातीं घेतलेल्या कार्यांत मी सफलता मिळवीनच मिळवीन, अशा श्रद्धेनें आपण कामास लागले म्हणजे यश आपोआप आपल्या मागून येऊं लागतें.

तेव्हां सांगायचें काय ? स्वतःला बिलकूल कमी लेखूं नका. तुमच्याठायीं ईश्वरानें अमाप सामर्थ्य ठेविलें आहे. तें उद्योग करून उपयोगांत आणा म्हणजे तुम्हीं आपल्या जीवनाचें सार्थक करून घ्याल.

दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :—DIVYANETRA

शिसा ऑप्टिशिअन (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून
उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतील
छबिलदास रोड, दादर (W. R.),

# बाबा दक्षिणा कां मागत ?

ले : द. शं. टिपणीस

**साईबाबा कधीं कधीं आपल्या भेटीस आलेल्या भक्तापाशीं दक्षिणा मागत असत. ती कोणत्या हेतूनें ? त्या घेतलेल्या दक्षिणेचें ते काय करीत याचें सोदाहरण स्पष्टीकरण लेखकानें या लेखांत केलें आहे.**

—संपादक

मानवी स्वभाव मोठा विचित्र आहे. कोणत्या ठिकाणीं कोणत्या वेळीं त्याच्या काय मनांत येईल याचा नेम नाहीं. एकच गोष्ट कधीं योग्य वाटते तर कधीं अयोग्य वाटते. अमक्यानें केलें सबब चांगलें. तीच गोष्ट तमक्यानें केली ना ? झालं तर मग ती वाईटच, संशयास्पद, असं आहे मानवी मन तोकडं. चौफेर नजर नाहीं.

**दक्षिणेचा प्रश्न**

दक्षिणेचेंच पहाना. साधुसंतांनीं मागितली ना ? झालं संशय आलाच मनांत ! साधुसंत विरक्त त्यांना कशाला पाहिजे पैसा ? कांहींतरी भानगड आहे खास. भोंदुपणा सगळा, आणि भटानें तीच गोष्ट केली तर ? त्याला दिलीच पाहिजे. बिचाऱ्याला पोट आहे ना ? देवळांत देवापुढें पैसा टाकला पाहिजे. पुजारी सेवा करतो, त्याचें नको कां पोट भरायला ? एकाद्या संस्थेनें हात पसरला तर हो हो द्यायला पाहिजेच. कार्याला पैसा लागणारच. असा चालतो मनाचा खेळ. बा, मना, तूं असं धरून चालतोस कीं दाक्षिणा म्हणजे केवळ पोटापाण्याची व्यवस्था व तीसुद्धां दया म्हणून जणूं कांहीं दुसरा उद्देशच नाहीं त्यामागें, साधुसंताना कसलं आलंय पोट असं समजतोस, घटकाभर खरं समजूं. पण काय रे, साधुसंत जर जगाच्या अभ्युदयासाठीं झिजत असतील तर त्यांच्या पोटापाण्याची काळजी समाजानें घेणें हें चूक ठरेल कीं उलट समाजाचें तें कर्तव्यच ठरेल ? तूं नाहीं कां ऑफीसमध्यें काम करून महिना अखेर कामाच्या मोबदल्याची अपेक्षा करीत ? तूं म्हणशील कीं आम्ही संसारी. आम्हाला आशा आकांक्षा आहेत. त्या साध्य करून घेण्यास पैसा पाहिजे. संत निरिच्छ. त्यांना कसल्या आशा आकांक्षा ? खरं आहे तें. बरं राहूं दे तें. पण दुसरें असं कीं संत कार्य करीत नाहीं, असले तर त्या कार्याला पैशाची जरुरी नाहीं असं कसं तूं समजतोस ? मग कार्यकर्त्या संतानीं आपल्या कार्यासाठीं दक्षिणेच्या रुपानें पैसा मागितला तर तें तुला संशयास्पद कां वाटावें व त्यांत तुला भानगड कां दिसावी ? समाजानें ज्याना संत केलें तेथें तूं म्हणतोस तसं कदाचित् असेलहि. पण जें स्वयंभू आहेत, अशा संतांच्या

ठिकाणीं तुला कधीं कांहीं वेडवाकडं दिसलंय काय ? सब घोडे बाराटक्के ही तुझी रीत, पण मना, तूं कधींतरी विचार केलाय काय कीं दक्षिणा म्हणजे काय,संत ती कां मागतात, ती कां द्यायची, कशी द्यायची ? नाहीं ना ? चल तर आपण याचा जरा खोलांत विचार करूं. मग पहा मना, तुझेंच मन बदलतें कीं नाहीं तें.

**हें संतांचें लक्षण नव्हे**

बाबांच्या हयातींत सुरुवाती सुरुवातीला कांहीं लोकांची मनें अशींच होतीं. बाबा दक्षिणा मागतात हें कांहीं संतांना शोभत नाहीं. हें संतांचें लक्षण नव्हे. असें कांहींना वाटत असे. खरं पाहिलं तर बाबा सुरुवातीला कोणाकडेहि दक्षिणा मागत नसत. ते कांहींच मागत नसत. त्यांच्या कफनीचा लांबलचक खिसा हें एक गुह्यच होतें. त्यांत काय असें हें कोणालाहि धड माहीत नव्हते. सुरुवातीला बाबा जळक्या काड्या ( काडीपेटींतील ) गोळा करून कफनीच्या खिशांत सांठवीत. त्यांचे ते पुढें काय करीत हें कोणासही समजलें नाहीं. पुढें बाबांच्या दर्शनास येणारे रिक्त हस्तानें दर्शन घेणें बरें नव्हे म्हणून बाबांपुढें पै-पैसा ठेवीत. दिडकी ( जुना पैसा ) असल्यास बाबा त्याची तमाखू वा तेल आणीत. ढबू ( दोन पैशाचें नाणें ) असल्यास तो ते परत करीत.

> लोकां पासून दक्षिणा मिषें । घेत असत बाबा जे पैसे ।
> कांहीं धमार्थ वाटीत जैसे । कांहीं तैसेचि ते देत ॥ ३८-७
> असो भक्त वा अभक्त । कोणाही पाशीं कांहीं न मागत !
> दिणकी दुगाणी ठेविल्या तेथ । तमाखू आणीत वा तेल । १६ अ. १४
> पुढें आले कोणाचे मना । रिक्त हस्ते दक्षिणेविना ।
> जावे कैसे संत दर्शना । तदर्थ दक्षिणा ते घेत ॥ ११८ अ. १४
> दिडकी दिधल्या घालीत खिसा । ठेवता कोणी ढबू पैसा ।
> परत करीत जैशाचा तैसा । क्रम हा ऐसा बहुकाळ । ११९ अ. १४

**बाबा दक्षिणेचें काय करीत**

हळूं हळूं भक्तांची संख्या वाढली. भक्तांच्या इच्छे नुसार बाबांची पूजा-अर्चा होऊं लागली व बाबा आलेल्या भक्तांकडे दक्षिणा मागूं लागले ही दक्षिणा ते सर्वांकडे सरसकट मागत नसत. दक्षिणा मागत म्हणजे अमुक रुपये दे अशी स्पष्ट आज्ञा करीत. मिळालेली दक्षिणा कफनीच्या खिशांत ठेवीत. मिळालेल्या दक्षिणेचा ते कधींहि संच करीत नसत. रोज ठराविक लोकांना ठराविक पैसे ते वाटीत असत. हें दान १ रु. पासून ५० रु. पर्यंत असे. कोणासी रोज रुपये तीस । कोणासी दहा पंधरा पन्नास । ऐसें मन मानेल तयास । वाटीत उल्हास वृत्तीनें ॥ गोरगरिबांनाहि दान करीत. परंतु अत्यंत आवडत्या अशा कांहीं भक्तांना त्यांनीं कधींहि पैसा दिला नाहीं. एकदां लक्ष्मीनें बाबांना विचारलें, " बाबा, तुम्ही अनेकांना नेहमीं पैसा देतां, मला मात्र कधींहि कांहीं देत

नाहीं. असं कां ?" बाबांनीं उत्तर दिलें, "लक्ष्मी, हा पैसा जायचा. राह्यचा नाहीं. मी तुला असं देईन कीं तें पिढ्यान्‌पिढ्या उपयोगी येईल. बाबाच्या कृपेनें लक्ष्मीबाईंच्या शेतांत भरपूर पीक अजूनहि येत आहे. बाबांची भक्ति म्हणजे पैसा मिळविण्याचें साधन एवढाच अध्यात्म ज्यांना समजतो अशा लोभिष्ठांच्या लोभाची शांति करण्यासाठीं हवन म्हणून वाटलेला हा पैसा. आला गेला सारखाच, अंतीं शून्य.

### म्हाळसापतींची गोष्ट

बाबांचे एकनिष्ठ भक्त म्हाळसापति अत्यंत गरिबी त्यांची. बाबा हें जाणत होते. तरी त्यांनीं म्हाळसापतीला एक पैसाहि कधीं दिला नाहीं. एका धनिकाला म्हाळसापतींची गरिबी पाहून कळवळा आला व त्यांची स्थिती सुधारण्यासाठीं पैसे देऊं केले. बाबांची अनुज्ञा घेतल्याखेरीज कांहींहि न करण्याचा म्हाळसापतीचा रिवाज असल्यामुळें हा पैसा घेण्याची अनुज्ञा त्यांनीं बाबाकडे मागितली ' काय जरूरी आहे. अल्ला सब करेंगा ' असें म्हणून बाबांनीं त्या धनिकास वाटेस लावलें.—तात्पर्य साई द्रव्य न याचीत । निजभक्तांसहि याचू न देत । अर्थ हा नित्य अनर्थ मानीत । भक्ता न पाडित तन्मोही ॥ अ. ३६–६० ॥ सारांश मिळालेली दक्षिणा बाबा वाटून टाकीत. कधी तींतून धुनीसाठीं लाकडे आणीत. कधीं हुंडीसाठीं खर्च करीत, पण पैसा साठविणें त्यांना ठाऊक नव्हतें. कित्येक वेळां वाटलेला पैसा मिळालेल्या पैशांपेक्षां अधिक असे. हा अधिक पैसा ते कोठून आणीत हें कोडेंच आहे. त्यांच्याजवळ तिजोरी नव्हती कीं गोदरेजचें कपाट नव्हतें. कंपनीचे खिसे हीच त्यांची तिजोरी निर्वाणसमयीं त्यांच्या तिजोरींत फक्त ९ रु. होते. तेहि त्यांनीं दान केलें व मग समाधि घेतली. बाबांच्या दक्षिणा मागण्यांत व पैसे वाटण्यांत एक प्रकारचा पंक्तिप्रपंच व तऱ्हेवाईकपणा आपणांस दिसतो. वरवर पहातां त्यांचें हें सर्व करणें अर्थहीन वाटतें. परंतु बाबांच्या प्रत्येक कृतीला व शब्दाला कांहीं खोल अर्थ अगर भक्ताला दिलेली शिकवण असते असा अनुभव पूर्वी अनेकांना आलेला आहे. यास्तव बाबांच्या दक्षिणा मागण्यांत कांहीं हेतू उद्देश वा कार्यसाधणें होतें कीं काय तें पाहूं.

### दक्षिणा कां मागत ?

भक्ताचें कल्याण साधण्यासाठीं बाबा दक्षिणा मागत असत. स्वतःला कांहीं पाहिजे किंवा कोणाला कांहीं द्यावयाचें आहे म्हणून त्यांनीं कधींहि दक्षिणा मागितली नाहीं. ज्याकडे दक्षिणा मागावयाची त्याचें वर्तमान भूतभविष्यकालीन कर्म व कार्य ते लक्षांत घेत असत. विस्मरणानें वचनभंग होऊन ऋणाचे धनी आपल्या भक्तानें होऊं नये कारण त्यायोगें अध्यात्मिक प्रगतीला अडथळा होतो. म्हणून तो दूर करण्यासाठीं बाबा दक्षिणा मागत. माणसाला गरज पडली, संकटाचा चिमटा बसला कीं,

तो कोणत्यातरी देवाकडे धांव घेतो. व देवा, माझें अमुक काम कर म्हणजे मी तुला तमुक देईन असें बोलून जातो. देव त्याचें काम करतो. पण हा भला देणें विसरतो. कित्येक राजकारणी भक्त जाणून बुजून डावलतात. परिणाम हा होतो कीं तें ऋण शिल्लक राहून जातें व त्या व्यक्तीच्या प्रगतीला अडथळे निर्माण होतात. असा एकादा भक्त आल्यास त्याला ऋणमुक्त करून योग्य प्रगतीपथावर आणून ठेवण्यासाठीं त्यानें कबूल केलेली पण आतां विसरून गेलेली रक्कम दक्षिणेच्या रूपानें बाबा मागून घेत असत. बाबांचें हें विशेष कार्य आहे. असं कार्य करणारे संत या दुनियेंत दुर्मिळ आहेत. अशा प्रकारें दक्षिणेमागें भक्ताचें कल्याण करण्याचा बाबांचा उद्देश असे. ही गोष्ट श्री साई सच्चरित्रांत आलेल्या दोन गोमांतकस्थ गृहस्थांच्या गोष्टींत बाबांनी स्पष्ट केली आहे.

**दोन गोमांतकियांची गोष्ट**

दोन गोमंतकस्थ गृहस्थ बाबांच्या दर्शनास आले. तेव्हां एका गृहस्थाकडून १५ रु. दक्षिणा बाबांनीं मागून घेतली दुसऱ्यानें न मागतां ३५ रु. दक्षिणा देऊ केली ती नाकारली. माधवराव ( शामा ) जवळच उभे होते. भूतकालीन घटना त्यांना कांहींच माहीत नसल्यामुळें बाबांनीं हा पंक्तिप्रपंच केला असें त्यांना वाटलें व ते बाबांना म्हणाले, " संतापासीं कांहीं विषमता । आपण होऊनी एका मागतां । स्वेच्छे कोणी देतां परततां । हिरमोड करितां तयाचा ॥ " यावर बाबांनीं उत्तर दिलें, " शामा तुजला ठाऊक नाहीं । मी तों कोणाचें कांहीं न घेई । येणें मागे मशीद आई । ऋणमुक्त होई देणारा ॥ परी ऋण वैर आणि हत्त्या । कल्पांतीही न चुकती कर्त्या । देवी नवसती गरजे-पुरत्या । मज उद्धरित्या सायास ॥ तुम्हांस नाहीं त्याची काळजी । वेळेपुरती करितां अजीजी । अनृणी जो भक्तांमाजीं । तया मी राजी सदैव ॥ " ( अ. ३६ )

**दत्ताला नवस केला**

फार वर्षापूर्वींची गोष्ट. त्या गृहस्थांपैकीं एक नोकरीसाठीं गोमांतकांत गेला. वण-वण फिरूनहि नोकरी मिळेना. फार हलाकीची स्थिति झाली बिचाऱ्याची. मानवी प्रयत्नांनीं हात टेकल्यावर तो देवाकडे वळला. मला त्वरीत नोकरी मिळाली तर मी पहिला पगार तुझ्या चरणीं अर्पण करीन असा त्यानें श्रीदत्ताला नवस केला. देव नवसास पावला. व त्याला १५ रु. ची नोकरी मिळाली. पण बहाद्दर नवस विसरून गेला. १५ चे वीस, २० चे २५ याप्रमाणें बढती होत होत तो चांगला पगारदार झाला. सुखाच्या चांदण्यांत आनंदानें राहूं लागला; पण वचन विस्मृती झाली व देवाचें ऋण त्याच्या माथीं राहून गेलें. पुढें ३५ वर्षांनंतर बाबांच्या दर्शनास तो आला असतां त्याला ऋणमुक्त करण्यासाठीं बाबांनीं त्याच्याकडून

१५ रु. दक्षिणा घेतली. दुसऱ्या गृहस्थाचा असा कांहीं प्रकार नसल्यामुळें बाबांनीं त्याची दक्षिणा नाकारली.

**दक्षिणा म्हणजे दान**

नादत्त उपतिष्ठति–दिल्याशिवाय मिळत नाहीं. जें द्यावें तें परत येतें. हा नियतीचा नियम आहे. प्रवाहाविरुद्ध जाण्यांत शहाणपणा नसून प्रवाहाच्या अनुरोधानें जाणें यांतच कल्याण आहे. देणें झालें कीं घेणें येणारच. दक्षिणा हें दान आहे. तो मोबदला नव्हे. म्हणून तैत्तेरिय उपनिषधांत दक्षिणेच्या देण्याघेण्याची शिफारस केली आहे. दक्षिणेमुळें दानाची संवय होऊन चित्तशुद्ध होते. मन पवित्र होतें जी दक्षिणा द्यायची ती मोकळ्या मनानें, आसक्ति विरहीत व आदरानें द्यावी. अध्यात्मामध्यें दोन ' क ' हे जबरदस्त अडथळे आहेत. त्यांचा मोह व लोभ भक्तांना नसावा व त्यांची आसक्ति कमी व्हावी याची काळजी बाबाना होती.भक्तांचा मोह व आसक्ति किती आहे हें अजमावण्या-साठीं बाबांनीं दोन कसोट्या शिर्डींत ठेवल्या होत्या. एक दक्षिणा व दुसरीं राधाकृष्णामाई हिच्या राहत्या ठिकाणास बाबा शाळा म्हणत. कित्येक भक्तांनी आपल्या दर्शनानंतर शाळेंत जाऊन ये असें तें सांगत. त्यांतला त्याचा उत्साह, तो शाळेंत किती वेळ घालवतो व व्दारकामाईंत किती वेळ घालवतो वगैरे वरून भक्तांची चित्तशुद्धि किती झाली आहे, हें ते पारखीत असत. दुसरी कसोटी दक्षिणा,भक्तांची धनासक्ति किती आहे हें अजमवण्यासाठीं भक्तांची चित्तशुद्धि व्हावी, त्याची धनासक्ति कमी व्हावी व अध्यात्मामध्यें त्याला प्रगतीपथावर आणून ठेवावा हा आणखी एक उद्देश दक्षिणा मागण्यामागें बाबांचा असे. हें तो प्राकृत भक्त । सर्वथैव प्रपंचारत । दक्षिणा दानें शुद्धचित्त । व्हावेंत हें मनोगत बाबांचें ॥ परम दयाळू साई समर्थ । साधावया भक्तहितार्थ । तयालागी दक्षिणा मागत । शिक्षणहि देत त्यागाचें ॥ अ. १४.

**शिर्डी येथील दोन शाळा**

शिर्डीमध्यें द्वारकामाई व राधा कृष्णाबाई या दोन शाळा बाबांनीं निर्माण केल्या होत्या. पहिल्या शाळेंत अध्यात्मिक शिक्षण मिळे तर दुसऱ्या शाळेंत मोह व लोभ हें अजमावण्यांत येई. दुसऱ्या शाळेंत मळलेले कपडे भट्टींत जाऊन शुद्ध व स्वच्छ होऊन आले कीं मग पहिल्या शाळेंत त्यांना इस्त्री होऊन शुभ्र स्वच्छ पांढऱ्या अशा घड्या निर्माण होत साधुसंत समाजाचा खळमळ धुऊन स्वच्छता करण्याचें कार्य करीत असतात. त्यांतलाच हा एक अभिनव प्रकार बाबांनीं अमलांत आणला होता. हें लक्षांत आल्यावर बाबांच्या चातुर्याचें व कल्पकतेचें मनाला कौतुक वाटतें, अचंबा वाटतो व मनांत येते कीं असा संत, असा महात्मा, असा देव, असा परमात्मा पूर्वी कुठें तरी कधीं तरी झाला होता काय ? माणसाला अकारण वाटणारी प्रतिष्ठा, लज्जा गळून पडण्यासाठीं बाबा एकाद्या भक्ताकडे दिवसांतून अनेकवेळां दक्षिणा मागत. पैसे

संपले तर उसनें घे, कांहीं कर पण दक्षिणा दे असें म्हणत. बुट्टी सारख्या लक्षाधीशालाही दक्षिणेंची याचना करायला त्यांनीं पाठविल्याची नोंद श्रीसाईसत्चरित्रांत आहे.

**मोक्ष मिळविण्याचें साधन**

मोक्ष मिळविण्यास दक्षिणा हें एक साधन आहे. या दृष्टीनेंहि बाबा भक्ताची योग्यता असल्यास दक्षिणा मागत. दक्षिणेनें मोक्ष कसा मिळूं शकतो याचें विवेचन बृहदारण्यकोपनिषधामध्यें केलेलें आहे. त्याचें मराठी करण व श्रीशंकराचार्यांचें दक्षिणेसंबंधीं म्हणणें बाबांचें एकनिष्ठ भक्त श्री देव – बाबांचें बाळ यांनीं श्रीसाईलीलेच्या ७ व्या वर्षाच्या अंकांतून दिलेलें आहे तें जसेच्या तसें देतो. त्यावरून या विषयाचा अधिक खुलासा होईल असें वाटतें. "शाकल्यानें याज्ञवल्क्याना निरनिराळ्या दिशांना कोणकोणत्या देवता आहेत व त्या कशांत प्रतिष्ठींत आहेत असें प्रश्न दिलें त्यांत दाक्षिण दिशेसंबंधानें जो मंत्र आहे त्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं दक्षिण दिशेचा मालक यम आहे. यमाचें अधिष्ठान यज्ञांत आहे. यमास जिंकावयाचें म्हणजे यज्ञास जिंकावयाचें व यज्ञास जिंकावयाचें म्हणजे यम सिद्धिस नेणारा जो ऋत्विज त्याला यजमानानें अंतःकरणपूर्वक श्रद्धेनें दक्षिणा देऊन तो यज्ञ विकत घ्यावयाचा. याप्रमाणें श्रद्धेनें दक्षिणा देऊन यज्ञ विकत घेणें म्हणजे यमास दक्षिण दिशेसह जिंकणें. यम म्हणजे मृत्यु. यमास जिंकणें. म्हणजे मृत्युस जिंकणें, मृत्युला जिंकणें म्हणजे प्रपंचाच्या एराझारांतून सुटणें व संसाराच्या येराझाऱ्यांतून सुटणें म्हणजेच मोक्ष मिळविणें."

**यज्ञ बुद्धीनें द्रव्याचा व्यय**

परंतु अशाप्रकारें यज्ञ करणें अतिकष्टदायक आहे एवढेंच नव्हे तर हल्लीं अशक्यच म्हणून ज्यानें हें कार्य सहजासहजीं साधेल असा एक द्रव्य यज्ञ भगवद्गीतेनें दिला आहे. (अ. ४ श्लो. ८८). "त्यांतील द्रव्य यज्ञाः शब्दाचा शंकराचार्यांनीं अर्थ दिला आहे तो असा—पवित्र स्थानीं पवित्रकाळीं, पवित्र पात्रीं, द्रव्याचा यज्ञबुद्धिनें व्यय करणें म्हणजे द्रव्ययज्ञ. [ हें सर्व योग एकेठिकाणीं मिळण्यास (दुरापास्त) म्हणून द्रव्य यज्ञ करण्यास संतांचें निवासस्थान हेंच सर्वोत्कृष्ट स्थळ (तीर्थ) ते जी दक्षिणा मागतील ती श्रद्धायुक्त अंतःकरणानें देणें हाच उत्तमोत्तम द्रव्य यज्ञ, व ते ज्या कालीं ती मागतलि तोच पवित्र काल. यावरून बाबा दक्षिणा कां मागत याचा उलगडा होईल, दक्षिणा मागत ती तो भक्त खरोखरच मुमुक्षु आहे किंवा नाहीं, याची द्रव्यासक्ति किंचित तरी कमी झाली आहे किंवा नाहीं, निदान मागितलेली दक्षिणा तिजवरील आपली सर्व सत्ता सोडून प्रेमानें आनंदानें व श्रद्धापूर्वक अंतःकरणानें देऊन द्रव्य यज्ञ करण्याची त्याची तयारी आहे कीं नाहीं हें पहाण्यासाठीं मागत. तसें दिसल्यास पुनः पुनः दक्षिणा मागत. हेतु हा कीं या द्रव्ययज्ञाच्या योगानें त्याजकडून कालांतरानें दक्षिण दिशेसह यमास (मृत्यूस) जिंकून त्याचें जन्ममरण चुकवावयाचें.

**दक्षिणेमागें विविध उद्देश**

अशा प्रकारें भक्ताचें विसरलेलें ऋण फेडून घेण्यासाठीं, त्याची चित्तशुद्धी होऊन धनासक्ति कमी होण्यासाठीं व भक्ताला मोक्षाप्रत नेण्यासाठीं बाबा दक्षिणा मागत असत. यांखेराज आणखीहि कांहीं उद्देश दक्षिणेमागें असत, बाबा कांहीं वेळां सांकेतिक आकड्यांत दक्षिणा मागत. अशा वेळीं बाबांना पैसे नको असत. एकदां श्री. नारके यांच्याकडे बाबांनी १५ रु. मागितले. माझ्याकडे देण्यास पैसे नाहींत असे श्री. नारके म्हणाले. तेव्हां बाबा म्हणाले कीं अरे तूं योगवासिष्ठ वाचतोस ना? त्यांतील दक्षिणा मला दे. याचा अर्थ असा कीं योगवाशिष्ठांतून तूं जें कांहीं शिकला आहेस तें मला दे म्हणजे ज्या तुझ्या चित्तांत मी आहे त्या चित्तांत तें ठेव, आत्मसात कर. एकदां बाबांनीं श्रीमती तर्खड यांच्याकडे ६ रु. दक्षिणा मागितले. बाइपाशा पैसे नव्हते. तिला फार वाईट वाटले. पण मागाहून जेव्हां तिला समजलें कीं बाबांना सहा रुपये नको होते तर कामक्रोधादि षड्रिपु माझ्या चरणीं वाहा व शुद्ध हो असें त्यांना सुचवावयाचें होतें तेव्हां तिला समाधान वाटले. एकदां दाभोळकरांना माधवरावकडे जाऊन १५ रु. दक्षिणा घेऊन ये असें सांगितलें. दाभोळकरांनीं बाबाचा निरोप माधवरावना सांगितला, तेव्हां त्यांनीं १५ नमस्कार केले व ही दक्षिणा माझ्यातर्फे बाबांना द्या असें म्हणाले. माधवरावचे हे १५ नमस्कार दाभोळकरांनीं बाबांना पावते केले. आतां १५ नमस्कार म्हणजे काय याचा अर्थ साईचरित्रांत स्पष्ट केला नाहीं. कदाचित नारके यांच्या गोष्टींत आलेला अर्थ १५ नमस्कारांमागें असेल. किंवा बाबा क्वचित १६॥ रु. दक्षिणा मागत. या १६॥ मागें जो अर्थ आहे तो थोड्याफार फरकानें असूं शकेल. नक्की अर्थ बाबाच सांगू शकतील. १६॥ रु. दक्षिणा दे म्हणजे काय दे? याचा अर्थ श्री. देव यांनीं दिला आहे तो असा "शरीरानें, वाणीनें, मनानें, इंद्रियांनीं म्हणजे पंचज्ञानेंद्रियांनीं—नेत्र, कर्ण, घ्राण, जिव्हा व त्वचा व पंचकर्मेंद्रियांनीं हस्त, पाद, वाचा, वायु (बृहती), उपस्थ व बुद्धिनें, अहंकारानें व प्रकृति स्वभावानें म्हणजे या एकंदर षोडशद्वारांनीं केलेले कर्म परमात्मास अर्पण करणें. (हें १६ रु.) चित्त हा अर्धा रुपया कारण परमात्म्याच्या तो अर्ध्या आसनावर बसला आहे." साईलीला वर्षे १०.

**पेरल्याशिवाय मिळत नाहीं!**

पेरल्याशिवाय उगवत नाहीं. श्रमाशिवाय मिळत नाहीं. कोजागिरी पौर्णिमेला भरपूर पिक पाहिजे असेल तर मृगनक्षत्रांत जवळ असेल नसेल ते बीबियाणें धरित्रीला विश्वासपूर्वक अर्पण केलें पाहिजे. जरुर ते श्रम केलें पाहिजेत. मशागत केली पाहिजे. तण वगैरेमुळें पिकाची हानी होणार नाहीं. याची काळजी घेतली पाहिजे. पाण्यानें बीबियाणें वाहून जाणार नाहीं इकडे लक्ष पुरविलें पाहिजे. अशाप्रकारें योग्य ती निगा घेतली व जरुर तें

श्रम केलें तर पेरलें त्याच्या दसपट पीक पदरांत पडेल. संत म्हणजे भक्तांना अन्नवस्त्र देणारी धरित्री होय. आपल्याजवळ असेल नसेल तें निष्ठेनें दक्षिणा म्हणून त्यांच्या चरणीं अर्पण करणें म्हणजे योग्य भूमींत बी पेरणें होय. संशयाच्या तणांनीं निष्ठेचा नाश होणार नाहीं वा अस्थिर अगर अधिरतेच्या लाटांनीं निष्ठा इतस्ततः वाहून जाणार नाहीं याची काळजी घेतलीं कीं जें संतांना दिलें तें दसपट होऊन भक्ताला परत मिळेल. संतांना दक्षिणा देणें म्हणजे भविष्यकालिन पिकाची तरतूद करण्यासाठीं आज पेरणें होय.

**गणपतराव बोडसांचा अनुभव**

नटवर्य गणपतराव बोडस एकदां शिर्डीला बाबाच्या दर्शनासाठीं गेले असतां बाबांनीं त्यांच्याकडे दक्षिणेची मागणी केली. गणपतरावांनी ती निष्ठापूर्वक दिली. पण बाबांनीं इतकें वेळां दक्षिणा मागितली कीं त्यांचें पाकिट रिकामें झालें. पुढें गणपतरावांना असा अनुभव आला कीं मुंबईला आल्यापासून त्यांचें पाकिट कधींही रिकामें राहिलें नाहीं. त्यांना उणीव अशी भासली नाहीं. सारांश हाच कीं संत घेतात पण दसपट देतात. आपण दक्षिणा मागतो याबद्दल कांहीं लोक कुत्सीतपणें व संशयानें टिका करतात हें बाबा अर्थातच जाणून होते. अशाना उद्देशून बाबांनीं स्पष्टपणें एकदां सांगितलें कीं,

मजला काय आहे घर । किंवा माझा आहे संसार ।
जे मज लागे वित्ताची जरूर । मी तो निर्धोर सर्वापरी ॥ अ. ३६
दक्षिणे लागीं ज्यानें मजला । असेल एक रुपया दिधला ।
दशगुणें मज तथा मोबदला । द्यावा लागला मोजून ॥ अ. ३५
आम्ही तरी काय करितों । एकपट घेतों दसपट देतों ।
क्रमें क्रमें ज्ञानपथा लावितों ।— ॥ अ. ३५

बा मना, आतांतरी समजूत पटली ना ?

---

॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

**महिला वस्तु भांडार**

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें लोंकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधानांचे व्यापारी.

**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

*** आमची कोठेंही शाखा नाहीं. ***

# संकटांशीं सामना देण्यांत पुरुषार्थ

—श्री. आप्पाराव.

संकटें कोणावर येत नाहींत ? तीं आलींच पाहिजेत. तें जिवंतपणाचें लक्षण आहे. ज्याच्या जीवनात संकटांना स्थान नाहीं त्याचें जीवन शुष्क होय. संकटें म्हणजे शत्रू नव्हत. तें देवाचें वरदान समजण्यांत आलें पाहिजे. संकटांमुळें आमच्यांत जागृति होते; नवचैतन्य निर्माण होते.

संकट आलें असतां भयभीत होऊन जाण्याचें कांहींच कारण नाहीं. त्याला धैर्यानें सामना देण्यासाठीं आपण सज्ज झालें पाहिजे. संकट ओढवलें म्हणून भागूबाईप्रमाणें पळून नाहीं जायचें ! त्याच्याशीं ' दोन हात करण्याची हिंमत बाळगायची. मग संकट आपोआप नाहींसें होतें. संकटांमुळें आपणांस नवें सामर्थ्य व नवीन प्रेरणा प्राप्त होत असते. मनुष्याच्या वाढत्या विकासांत संकटांचें स्थान फार महत्त्वाचें आहे.

संकट आलें असतां वाटेल तेवढें प्रयत्न करून त्यांतून पार पडण्यासाठीं आपण धडपडतों. नाना युक्त्या लढवतों व त्यांतून पार पडतों. संकट पार पाडण्यांत जो आनंदाचा अनुभव येतो त्याचा लाभ दुसऱ्या कशांतहि होणार नाहीं.

जें काम करीत असतां तें सहज रीतीनें, लीलेनें पार पडतें. त्यांत आनंद वाटत नाहीं, मार्गांत अडचणी आडव्या आल्या पाहिजेत. आपली विचारशक्ती व कर्तव्यबुद्धि यामुळें जागी होतें. तशी ती जागी होण्यांतच मौज आहे.

परंतु मनुष्यस्वभाव किती विचित्र आहे पहा ! तो ज्या कामांत अडचणी नाहींत, किंवा कमति कमी, तें काम तो पत्करतो. अडीअडचणींचें त्याला वावडें असतें.

परंतु नाहीं. ज्यांत पुष्कळ अडचणी आहेत अशा कार्याला आपण प्रथम हात घातला पाहिजे. या जगांत कठीण कांहीं नाहीं. तुम्हीं करायला लागलें पाहिजे. आळसाला व सुखासीनतेला घट्ट मिठी मारून बसतां कामा नये. त्यांत तुमचा पराभव आहे.

हें जीवन कशासाठीं ? पुरुषार्थासाठीं. मग संकटांना व अडचणींना घाबरायचें कां म्हणून ?

हात जोडून स्वस्थ बसून न रहातां आपण निरंतर कामांत दंग होऊन राहिलें पाहिजे. म्हणजे आपोआप मार्ग सांपडतो. स्वतःला सतत कामकाजांत गुंतवून ठेविलें पाहिजे. तुम्हीं कोणत्याहि संकटावर विजय मिळवूं शकाल. संकटांस सामना देण्यासाठीं सदासर्वकाळ सिद्ध रहा. त्यांना घाबरू नका.

आपण सदैव, ' आगे बढो ' हें तत्त्व संभाळले पाहिजे. सतत वाटचाल करीत राहिलें पाहिजे म्हणजे तुम्हाला यश मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं. अपयश कोणाच्या वाट्यास


येते ? निरुद्योगी आळशी व कांहीं एक हालचाल न करणाऱ्या माणसाच्या वाट्यास अपयश येत असतें.

आपण या जगांत यशस्वी, व अयशस्वी झालेली माणसें पहातों. यांचें जीवन तपासून पहाण्याचा तुम्ही कधी प्रयत्न केला आहे का ? यशस्वी जीवन कोणाचें झालें ? सतत उद्योगरत असणाऱ्या माणसाचें व संकटांस धैर्यानें सामना देणाऱ्या माणसाचें,

कितीहि अवघड व कठीण कार्य असो. तें बिकट दिसतें म्हणून त्यापासून आपण दूर नाहीं पळायचें ? त्याला जाऊन चिकटायचें ! हा असला पाहिजे आपला बाणा !

तुम्हीं जो मार्ग स्वीकाराल किंवा जें काम हातीं घ्याल त्यांत कितीहि अडचणी असूं द्या. त्यामुळें बिलकूल घाबरून जाऊं नका. ईश्वरावर संपूर्ण श्रद्धा ठेवून कामास लागा. यश तुमच्या पदरांत पडल्याशिवाय रहाणार नाहीं.

संकटांपासून दूर दूर पळण्यांत पुरुषार्थ नाहीं तर त्यांना निधड्या छातीनें सामोरे जाऊन त्यांचा चेंदामेंदा करण्यांत खरा पुरुषार्थ आहे. आणि त्यासाठींच तर आपला जन्म आहे !




# लहान मुलांच्या आंकडीवर

## जुनें आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# वाणीचें पावित्र्य

देवानें आपणांस जी वाणी बहाल केली आहे तिचा आपण निरंतर सदुपयोग केला पाहिजे. अपशब्दांनीं दुसऱ्यांचें अंतःकरण दुखविलें जाईल, अशा शब्दांनीं वाणी विटाळली जातां कामा नये.

वाणीचा सदुपयोग कशा रीतीनें होऊं शकतो? सत्य बोलण्यानें, हितकर बोलण्यानें व जरूर तेवढेच बोलण्यानें.

परंतु ही साधना शक्य कशी व्हायची? त्याला उपाय एकच आहे. मनावर ताबा ठेवतां आला पाहिजे. जें आपल्या मनांत येतें तेंच वाणीच्या रूपानें बाहेर पडतें. वाणीच्या मागें मन खडें असतें. त्या मनांत दुष्ट मत्सरी व खोड्यानाळ्या विचारांना कधींहि थारा द्यावयाचा नाहीं, अशा निर्धारानें आपण वागलें पाहिजे.

मन सुंदर-सर्वांगसुंदर बनविण्यांत आलें पाहिजे. मनाला कसलाहि मळ लागणार नाहीं याबद्दल खबरदारी घेण्यांत आली पाहिजे, म्हणजे मग वाणी आपोआप सुंदर स्वरूप धारण करते.

आपलें मन सरळ असावें, सहानुभूतीचा ओलावा तेथें भरपूर असावा. तेथें सर्वांभूतीं प्रेमाला थारा मिळावा. मनांत खोडसाळ विचारांना कधींहि स्थान मिळूं नये.

आपलें मन इतरांबद्दल प्रेमानें व सहानुभूतीनें ओतप्रोत भरलेलें असल्यावर वाणीहि त्याच गुणांची सर्वांवर खैरात करील.

मन भलत्यासलत्या गोष्टींच्या मागें लागलें नाहीं तर वाणीहि नसत्या उठाठेवी करण्याच्या भानगडींत कधींहि पडणार नाहीं.

तेव्हां वाणीला सौंदर्य प्राप्त करून देणारा हा सरळ मार्ग आहे. त्या धोपटमार्गानें आपण गेलों तर आपलें कल्याण झाल्याशिवाय कधींहि रहाणार नाहीं.



# ईश्वर दत्त तीन साधनांचा सदुपयोग

शरीर मन व वाणी हीं ईश्वरानें आपणांस दिलेली तीन प्रमुख साधनें आहेत. या जगांत आपण जीं कांहीं बरीवाईट कृत्यें करतों ती या तीन साधनांपैकीं कोणत्या तरी एकाच्या सहाय्यानें. तेव्हां एक गोष्ट आपण नेहमीं लक्षांत बाळगली पाहिजे कीं, हीं तिन्हीं साधनें नेहमीं पवित्र राखण्यासाठीं झटावयाचें. त्यांना दुष्ट आचारविचारांचा बिलकूल संपर्क लागू द्यावयाचा नाहीं. त्यांना सदासर्वकाळ पवित्र वातावरणांत वावरूं द्यावयाचें.

या जगांत सर्वांत महत्त्वाचें व पुण्यदायक कर्तव्य जर कोणतें असेल तर तें म्हणजे ईश्वर सेवा. ईश्वराचें नामस्मरण त्याचें भजन पूजन सदासर्वकाळ, कोणतेंहि कार्य करीत असतां त्याचें पुण्यदायक स्मरण कोणत्याही कार्यांत असा. त्याची आठवण सतत ठेवा. जें कांहीं करितां तें त्याचें नांव घेऊन त्याच्यासाठीं म्हणून करा. हें त्याच्यासाठीं त्याच्या सेवेसाठीं करीत आहे अशी भावना अंतःकरणांत बाळगा. अशा रीतीनें वागलांत म्हणजे तुमच्याकडून पापाचरण सहसा घडणार नाहीं. तें कार्य उत्तम प्रकारें पार पडेल.

मनांत तामसी दुष्ट व पापी विचारांस कधींही थारा देऊं नका. त्यांचें जरासुद्धा वारें लागून घेऊं नका. नेहमीं चिंतन करायाचें तें सद्विचारांचें. दुष्ट व पापी विचार मनांत येऊंच द्यावचे नाहींत.

वाणीचा उपयोग हितकर, कल्याणकर व गोड बोलण्यासाठींच करावयाचा वाणी कधींहि वाईट विचारांनीं विटाळूं द्यावयाची नाहीं. कोणाला लागेल असें वचन कधींहि उच्चारावयाचें नाहीं. देवाचें गुणगाण करण्यासाठीं वाणींचा शक्य तेवढा उपयोग करायचा. कोणाची निंदा, चहाडी करण्यासाठीं वाणीचा उपयोग करावयाचा नाहीं. पुष्कळांना स्वतःची बढाई बोलून दाखविण्याची खोड असते. ती फार वाईट ! वाणी एखाद्याचें कल्याण करूं शकते; तसेंच अकल्याणहि करूं शकतें.

अशा, रीतीनें शरीर, मन व वाणी यांच्यावर ताबा ठेऊन व अहर्निश ईश्वराचें स्मरण ठेऊन तुम्हीं वागूं लागला म्हणजे तुम्हीं या जगांत जन्माला आल्याचें सार्थक झालें असें म्हणता येईल.

# रामायणांतील एक उज्वल व करुणरम्य प्रसंग

**तारेचा धीरोदात्तपणा**

कोणा एका व्याधाच्या बाणाला वाली बळी पडल्याची कुवार्ता किष्किंधा नगरीपर्यंत येऊन पोंचली आणि जिकडे तिकडे एकच हाःहाकार उडाला. समस्त वानरजनांची मति अगदीं कुंठित होऊन गेली. हा सारा सांवळागोंधळ पहातांच तारेनें आपला शोक कसाबसा आवरता घेतला आणि आपल्या प्रजाजनांना उद्देशून ती म्हणाली, " आजवर आपल्या राजासमवेत तुम्ही मोठ्या खुषीनें रणांगणावर जात होतां, मग आजच ही दुर्बुद्धि तुम्हांला कुठून आठवली ? आजच ही पळापळ कां ? लोक हो, तुम्हीं भिऊन पळापळ सुरू करावी असं कांहींही घडलेलं नाहीं. सुग्रीवाला राजपद देण्यासाठींच केवळ रामानें वालीचा वध केला आहे तुमचे प्राण अगदीं सुरक्षित राहातील. एक राजा जाऊन दुसरा राजा येईल एवढंच. विनाकारण घाबरून पळूं नका. "

मृत्युशय्येवर पडलेल्या वालीच्या भेटीला ती निघाली तेव्हां वानर तिला म्हणाले, " आम्हीं अंगदाला सिंहासनावर बसवूं नि शेवटपर्यंत गड लढवूं. सुग्रीवाशीं व त्याच्या सहकाऱ्यांशीं प्राणपणानें झुंज देऊं. "

यावर तारेनें उत्तर दिलें, " आतां माझे पति तर गेलेच. आतां कसलं राज्य नि कसलं काय ? " आणि मोठा धीर धरून ती राम-लक्ष्मण उभे होते त्या ठिकाणीं आली.

प्राणघातक घावामुळें आयुष्याच्या अखेरच्या घटका मोजणाऱ्या वालीला पाहातांच तिचा शोक अनावर झाला नि आक्रोश करतां करतां ती म्हणाली,

" आजवर सहस्रावधि योद्धे तुम्हीं स्वर्गलोक धाडलेत, नि आज स्वतः तुम्हालाच इथं धारातीर्थी पडावं लागलं ना ! पण नाथ, मला एकटीला मागें ठेवून तुम्हांला जाववतं तरी कसं ? "

**सुग्रीवाचा पश्चात्ताप**

पाठोपाठ अंगद तेथें आला. त्याला पाहातांच सुग्रीवाचा ऊर भरून आला. केवळ आपल्यामुळेंच घडूं नये तें घडतें आहे, असें त्याला वाटूं लागलें. हा त्याचा पश्चात्ताप खराच होता. अनेक वर्षांच्या बंधुभावाचा अशा निर्घृण रीतीनें शेवट झालेला पाहून कोणाचें मन द्रवणार नाहीं ? सूड उगवल्यानें क्षणिक समाधान हें बेचव व निःसत्त्व असल्याचीच प्रचीति

यांच्या कच्छपीं जाणाऱ्या माणसांची कशी दैना उडते हें अनेकवार यांचि डोळां पाहूनहि किती जणांना या सत्याचा साक्षात्कार होतो ?

इकडे दुःखानें व्याकुळ झालेली तारा आक्रोश करीतच होती, " नाथ, मला नि अंगदाला असं अनाथ करून आपण एकटेच कसे निघून गेलांत हो ! "

हनुमान आपल्या परीनें तिचें सांत्वन करीत होता, " अशीं माणसं स्वर्गलोकीं जात असतात. तुझा शोक तूं आवरता घे पाहूं. लवकरच अंगदाला राज्याभिषेक होईल नि पुन्हा सर्वत्र आनंद खेळूं लागेल. यापुढें आपण सर्वांनींच अंगदाकडे पाहिलं पाहिजे. आतां विचार करायचा एकाच गोष्टीचा. वालीचे अंत्यसंस्कार अजून व्हायचे आहेत. "

तारा म्हणाली,

" अंत्यसंस्कार सुग्रीव करील नि अंगदाचं पालनपोषणहि तोच करील. आतां माझं असे काय उरलं आहे इथें ! हजार अंगद आले तरी त्यामुळें माझे पति मला थोडेच मिळणार आहेत परत ? मलाहि आतां त्यांच्याबरोबर जायला हवं. दुसऱ्या कोण-त्याच गोष्टीनें माझ्या मनाचं समाधान होणार नाहीं ! "

**वालीचे अखेरचे शब्द**

पण वालीची प्राणज्योत अजून पुरती मालवली नव्हती. अजूनपर्यंत तो बेशुद्धा-वस्थेंतच पडून होता. अखेरचें म्हणून त्यानें डोळे उघडले आणि सुग्रीवाला उद्दे-शून तो म्हणाला, " आपण दोघे स्नेहभावानें राहिलों असतों नि परस्परांच्या सहकार्यानें राज्यशकट हांकला असतां तर दुधांत साखर पडली असती. पण दैवयोग असा होता कीं तसं कांहीं घडायचं नव्हतं. जें घडलं आहे त्याला सर्वस्वी मीच दोषी आहे यांत शंका नाहीं. पण आतां त्यासंबंधीं बोलून तरी काय होणार आहे ? माझ्या मागें राज्याचा कारभार तूंच पाहावास अशी माझी इच्छा आहे. आम्हीं दोघानाहीं प्राणांहून प्रिय असलेला अंगद आज मी तुझ्या स्वाधीन करुन जात आहे. यापुढें तूंच त्याचा पिता, तुझ्या मायेची भरपूर पाखर त्याला मिळूं दे. एवढी अखेरची इच्छा तरी तूं मानशील असा मला विश्वास आहे. नाहीं म्हणूं नकोस आणी तारेलाहि अंतर देऊं नकोस. ती निर्दोष आहे, प्रेमळ आहे, इतकेंच नव्हे तर सुज्ञ आणि दूरदर्शी आहे. तिचं मार्गदर्शन तुला उपयोग पडल्यावांचून राहाणार नाहीं. पुढें घडणाऱ्या गोष्टींची चाहूल ती घेऊं शकते. तिचा उपदेश लाथाडला नाहास तर तुझं कल्याण होईल. मला इंद्रदेवांनीं दिलेला रत्नहार निरोपाची भेट म्हणून मी तुला देत आहें. हा रत्नहार तुझं करील. आतां सगळं संपत आलं आणि त्याचबरोबर माझा रागहि मावळूं लागला आहे. देव तुला सुखी करो ! "

मृत्युशय्येवर पडल्या पडल्या उदार वालीनें असा उपदेश करून आशीर्वाद दिला. मग अंगदाकडे पाहून तो म्हणाला, " आतां यापुढें सुग्रीव तुझा राजा. त्याच्याशीं राजनिष्ठ राहा नि करतां येईल तेवढी त्याची सेवा कर. "

कोसळणाऱ्या वृक्षावरोबरच त्याला मिठी मारून राहिलेली वेलहि कोसळते तसें तारेचें झालें होतें.

मग नीळानें अगदीं हलक्या हातांनीं वालीच्या छातींत रुतून बसलेला बाण काढून घेतला. त्याबरोबर घळघळा रक्त वाहूं लागलें आणि क्षणार्धांतच वालीचे प्राण पंचत्वांत विलीन झाले. तारा अधिकच आक्रोश करूं लागली. पित्याला नमस्कार कर म्हणून तिनें अंगदाला सांगितलें आणि ती वालीच्या निष्प्राण देहाकडे पाहून म्हणाली, "नाथ, अंगद तुम्हांला नमस्कार करीत आहे. एकदां बोला तरी त्याच्याशीं. हाय रे दैवा...आज आम्ही अनाथ झालों...अनाथ झालों!"

**काम हा मानवाचा वैरी**

सुग्रीवाला हें सारें पाहावत नव्हतें. स्वतःशींच तो म्हणत होता, 'स्वार्थापुढें माझी मति विकृत होऊन गेली. मीं वालीला गुहेंत कोंडलें नि त्याच्या धनदौलतींवर हवा तसा हात मारून घेतला. केवढा पापी मी!'

कदाचित् क्षणिक पश्चात्तापामुळें सुग्रीव स्वतःला दोष देऊं लागला होता असें कोणी म्हणेल. पण एवढी गोष्ट मात्र खरी, कीं ज्ञानाच्या अभावीं मन भ्रष्ट होतें व त्यामुळेंच आपल्या हातून दुष्कृत्यें घडत असतात आणि पापाच्या खाईंत आपलीं पावलें अधिकाधिक खोल रुतत असतात. मोहाला आपण कळत न कळत कां होईना पण बळी पडलों, असें सुग्रीवाला वाटलें तर त्यांत अस्वाभाविक असें कांहींच नाहीं.

काम या संस्कृत शब्दाचा अर्थ आहे : इच्छा, लोभ, विषयवासना, स्वार्थ. काम हा माणसाचा शाश्वत वैरी आहे. या वैऱ्यावर ज्यानें मात केली तो जिंकला. भगवद्गीतेच्या तिसऱ्या अध्यायांतील शेवटच्या सात श्लोकांत हेंच सांगितलें आहे. या अध्यायाच्या अखेरीस भगवान् श्रीकृष्ण म्हणतात : जहि शत्रुं कामरूपं दुरासदम्।

सुग्रीवाला वासनेनें घेरलें तसें वालीला क्रोधानें वेढलें होतें. सुग्रीवानें हेतुपुरसर आपणांस गुहेंत कोंडलें आहे हें त्याच्या लक्षांत आलें, तेव्हांच सुग्रीव आपल्या राक्षसांवरचा स्वारींत साहाय्य करण्यासाठीं आला नसून त्याच्या मनांत वेगळाच कावा आहे हेंहि तो उमजून चुकला होता. असुरांनीं वालीचा बळी घेतला म्हणजे अनायासेंच त्याचें राज्य आपणांस बळकावितां येईल, अशी खूणगांठ सुग्रीवानें मनाशीं बांधली पाहिजे, हें उघडच होतें.

स्वतःच चेतविलल्या क्रोधाच्या आगींत अखेर वालीची आहुति पडली. संतापाच्या भरांत त्यानें आपल्यासारख्या भावाची हकालपट्टी केली आणि त्याचा रोष ओढवून घेतला. क्रोधाच्या वाटेनें वाली पापाकडे चालला होता.

**काम आणि क्रोध**

काम आणि क्रोध हीं पापाच्या नदीचीं उगमस्थानें आहेत. या दोन शत्रूंवर विजय मिळविल्याशिवाय पापाच्या कारावासांतून कोणाचीहि सुटका होण्यासारखी नाहीं.

सुग्रीवाचा पश्चात्ताप अजून संपला नव्हता.

'मी एवढा पापी असतांनाहि वालीनें माझा वध कां करून टाकला नाहीं? त्यानें नुसतंच मला हद्दपार केलं, पण जीवदान दिलं. सूडभावनेच्या नादीं लागून मीं माझे पुढचे पवित्रे रचले नि अखेर त्याच्या प्राणांवर घाला घातला. माझ्यासारखा चांडाळ, पापी या अवनीतलावर शोधून सांपडणार नाहीं आणि असं असूनहि अखेरचे डोळे मिटतांमिटतां त्यानें राज्याचं उदक माझ्या हातावर सोडलं, इतकंच नव्हे तर इंद्रानें दिलेला रत्नहारहि त्यानें मला नजर केला. एवढ्या उदात्त अंतःकरणाचा पुरुष कुठें पाहायला मिळेल का? प्रत्यक्ष भावाच्या प्राणांवर उठलेला मी...नराधम...कशासाठीं मी तरी माझ्या नीच आयुष्याला जळवेसारखा चिकटून राहूं?'

जुन्या रूढी मानणारे लोक अजूनहि वर्षांतून एकदांतरी प्रार्थना म्हणत असतात. कामोऽकार्शीत् । मन्युरकार्शीत् । म्हणजे, वासनेनें मला फसवून पापाच्या मोहांत ढकललें. या मंत्राचा सतत जप करून धार्मिकप्रवृत्तीचीं माणसें आपलीं मनें शुचिर्भूत करीत असतात. सर्वांनीच हें करून पाहाण्यासारखें आहे. कामोऽकार्शीत्। मन्युरकार्शीत्। नारायणाय नमः॥ ह्या जपानें पश्चात्तापाची भावना मनांत उमलूं लागते. हृदय निर्मळ होतें. परमेश्वराच्या चरणांचा स्पर्श मनाला होतो.

भीतभीतच राम अश्रु ढाळीत बसलेल्या तारेजवळ आला. त्याला वाटलें होतें, आपल्याला पाहातांच ती संतापून उठेल. पण तसें कांहीं झालें नाहीं. क्रोधभावनेची पुसट रेषाहि तिच्या चेहेऱ्यावर दिसत नव्हती. आपल्या पतीचा वध करणाऱ्या रामाला उद्देशून ती जें म्हणाली तें वीरपत्नीला शोभून दिसण्यासारखें असेंच होतें. "ज्या शस्त्रानें तूं माझ्या पतीचा वध केलास त्याच शस्त्रानें तूं माझेहि प्राण हरण केलेस तर मला त्यांच्या सोबत तरी जातां येईल. माझ्याविना स्वर्गांत झाले म्हणून ते सुखी कसे होतील? मला मारलंस तर तें कांहीं पाप होणार नाहीं. उलट, आमच्या पुनर्मीलनाचं पुण्यच तुझ्या पदरीं पडेल. त्यामुळें माझ्या पतीचा विश्वासघातानें वध केल्याचा जो कलंक तुला लागला आहे तो धुवून निघेल व तूं पापमुक्त होशील."

**तारेचा शहाणपणा**

वाल्मीकि म्हणतातः राम हा विष्णूचा अवतार आहे हें तारेनें केव्हांच जाणलें होतें. लक्ष्मणाची माता सुमित्रा हिच्याप्रमाणेंच ताराहि एक ज्ञानी स्त्री होती, अशी परंपरागत श्रद्धा आहे. रामानें आपल्या पतीला विश्वासघात करून मारल्यामुळ तिच्या मनांत पहिल्या पहिल्यांदा त्याच्याविषयीं संतापाची भावना निर्माण होणें हें स्वाभाविक असलें, तरी तिला रामाचें प्रत्यक्ष दर्शन होतांच त्याचें ईश्वरीस्वरूप तिला दिसल्याशिवाय राहिलें नाहीं.

आपण कथा-कादंबऱ्या वाचतो तसेंच रामायणहि वाचलें तर या गोष्टींना कांहीं महत्व द्यावें असें आपणांस वाटणारहि नाहीं, पण भक्तिमार्गाचा अवलंब करणाऱ्या वाच-

काला हें अतार्किक आहे असें खचितच वाटणार नाहीं. या प्रसंगाचें गायन करतांना तुलसीदासांनीं आपल्या राम कथेंत म्हटलें आहे.

शंकर पार्वतीला सांगतातः " पाहा, उमे, प्रभु रामचंद्र पाहा कसा कळसूत्री बाहुली नाचवतो आहे या पृथ्वीच्या पाठीवर ! " प्राचीन महाकाव्यांचा अर्थ ज्याला जाणून घ्यावयाचा असेल त्याला भक्तिमार्गाखेरीज गत्यंतरच नाहीं.

पण केवळ बौद्धिक दृष्टिकोनातून पाहिलें तरी तारेच्या मुत्सद्देगिरीचें कौतुक वाटायला हवें. पुढें काय वाढून ठेवलें आहे हें जाणण्याइतकी ती सुज्ञ खासच होती. जें घडलें तें घडून गेलें, त्याविषयीं शोक करण्यांत आतां कांहीं अर्थ नाहीं हें तिला कळत होतें. सुग्रीव सुदैवी म्हणून त्याला रामाचें सहकार्य मिळालें होतें. वालीनें इहलोकाची यात्रा संपवली होती. आतां तिच्या दृष्टीनें करण्यासारखी अशी एकच गोष्ट उरली होती, आणि ती म्हणजे अंगदाचें पालनपोषण. सुग्रीव व राम-लक्ष्मण यांच्यात वितुष्ट आणण्यानें काय साधणार होतें ? यापुढें युद्धापेक्षां शांतीच्याच मार्गाचा अवलंब करणें श्रेयस्कर ठरणार होतें.

केवळ अंगदाकडे पाहूनच तिनें आपला क्रोध आवरता घेतला होता. सर्वांची सहानुभूति मिळविणें हें आतां आपल्याला क्रमप्राप्त आहे, हें त्या ज्ञानी स्त्रीनें हेरलें होतें.

यथाकाल वालीचे सर्व अंत्यसंस्कार पार पडले. सुग्रीवाला राज्याभिषेक करण्यांत आला आणि युवराज म्हणून अंगदाच्या नांवाची द्वाही फिरविण्यांत आली.



ए. आर. सावंत अॅन्ड ब्रदर्स

२६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४

तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण. होलसेल व रीटेलर्स

# अध्यात्मिक जीवन

लेखक : **एक साधक**

**उत्तम काया मिळुनि स्वामिया गेलों मी वायां।**
**शुद्ध दगड हा पंत विठ्ठल स्वामी प्रभुराया॥**

ह्या पद्यांत भगवद्भक्त विठोबा अण्णा परमेश्वराला हांक मारून सांगतात, कीं, हे प्रभुराया, हा विठ्ठलपंत शुद्ध दगड आहे. स्वतःला एका अचेतन, जड, क्षुद्र मोलाच्या पदार्थाची उपमा देण्याला विठ्ठलपंतांना कारण तरी काय झालें असावें? त्यांच्याच शब्दांनीं सांगावयाचें म्हणजे, त्रिताप चुकविण्यासाठीं परमेश्वराची जी सेवा घडली पाहिजे, ती त्यांच्या हातून झाली नाहीं व त्यामुळें उत्तम काया प्राप्त झाली असूनहि आपण फुकट गेलों हें कारण सांगून आपल्या हातून होऊं नयेत तीं कृत्यें कशीं झालीं व जीं व्हावयाला पाहिजे होतीं तीं कशीं झालीं नाहींत व त्यामुळें कृतीचा व कृति-अभावाचा आपल्याकडून प्रमाद कसा घडला ह्याचें त्यांनीं विस्तारानें वर्णन केलें आहे व शेवटीं परमेश्वराच्या दयाळुत्वावर भरंवसा ठेवून ते त्याला शरण जाऊन आपलें रक्षण करण्याला त्यालाच विनवीत आहेत. विठ्ठलपंत म्हणतात कीं, आपल्याला उत्तम काया प्राप्त होऊनहि आपण वायां गेलों. शरीर वायां गेलें असें ते म्हणत नाहींत. मग वायां गेलें तें काय? अर्थातच शरीरांत वास करणारा आत्मा, आणि आत्मा वायां जाणें म्हणजे काय? तर त्याची वाढ किंवा प्रगति म्हणजे उन्नति न होणें। वाढ जी होते, ती सजीव पदार्थांची. निर्जीव पदार्थ कितीहि अमोलिक असले, कितीहि दुर्मिळ असले तरी त्यांना एकदां जी स्थिति प्राप्त झाली तींत त्यांच्या गुणांत भर पडत नाहीं. ह्याच्या उलट सजीव पदार्थ कितीहि क्षुद्र असला तरी त्याची योग्य जोपासनेनें वाढ करितां येते. झाडपाल्याचें बीं क्षुद्र आहे तरी तें वाढतें; पशुपक्षी वाढतात; लहान मुलांची वाढ होते. ह्या सजीव वस्तु निर्माण झाल्यापासून त्यांची पूर्ण वाढ होईपर्यंत जो काळ जातो त्याच्या कमीअधिकत्वावर त्या वस्तूंचें महत्त्व अवलंबून असतें.

वनस्पतिकोटींतील भाजीपाल्याचें किंवा गवताचें बीं रुजल्यापासून तीन-चार महिन्यांत त्याची वाढ पूर्ण होते, म्हणून ह्या वनस्पति क्षुद्र समजल्या आहेत. चिमण्या, पारवे इत्यादिकांची पांचसहा महिन्यांत वाढ होते म्हणून तेहि क्षुद्र समजले आहेत. चंदनाचे वृक्ष, ओक, सागवान, कॅलिफोर्निआमधील तांबड्या लांकडाचीं झाडें ह्यांची पूर्ण वाढ व्हावयास अनेक वर्षें, किंबहुना एक एक शतकहि लागतें. म्हणून वनस्पतिकोटींत ह्या वृक्षांचें महत्व फार आहे. गरुडाची वाढ व्हावयास व हत्तीची पूर्ण वाढ होण्यास फार वर्षें लागतात म्हणून पक्षी व पशुकोटींत अनुक्रमें ते मोठे मानले जातात. लहान मूल जन्मास आल्यापासून त्याच्या शरीराची पूर्ण वाढ होण्यास वीस-पंचवीस

वर्षें लागतात व पुढेंहि त्याचें आयुष्य दीर्घ असतें. ह्या व इतर कारणांनीं मनुष्य सर्व प्राणिमात्रांत श्रेष्ठ गणलेला आहे. मनुष्याचीं बालपणांतील अनेक वर्षें परावलंबी-पणांत जात असल्यामुळें व त्या काळांत त्याची जोपासना करण्याचें कार्य त्याच्या मातापितरांवर पडत असल्यामुळें अनेक समाजस्वास्थ्याच्या संस्था अस्तित्वांत आल्या आहेत. एकपत्नीव्रत, गृह, शाळा व तत्समान समाजाचें पोषण करणाऱ्या संस्था ह्यांची उत्पत्ति ह्या परावलंबी बालपणामुळेंच आहे. मनुष्याच्या शरीराची पूर्ण वाढ झाली म्हणजे त्याची वाढ पूर्णत्वास पोहोंचली, असें कोणीहि समजत नाहीं. मनुष्य म्हणजे केवळ शरीर नव्हे. त्याला बुद्धि म्हणजे ज्ञानार्जनाचें साधन आहे. त्याला अंतःकरण म्हणजे प्रेम करण्याचें साधन आहे. त्याला आत्मा आहे, म्हणजे त्याला अमृतत्व प्राप्त झालेलें आहे. मनुष्याच्या शरीराची वाढ संपली तरी ह्या सर्वांची वाढ सतत होतच राहते. आपल्याकडे कित्येकांचा असा समज आहे कीं, मनुष्याला अकलदाढ आली म्हणजे तो सुमारें तीस वर्षांचा झाला—म्हणजे त्याच्या बुद्धीची वाढ संपते. पण हा समज चुकीचा असून भ्रामक आहे. बुद्धीचा व स्मरणशक्तीचा योग्य उपयोग करीत राहिल्यास तिची नेहमींच वाढ होत राहाते.

## ईश्वराची अगाध लीला

सर वॉल्टर स्कॉट ह्यानें आपली पन्नाशी उलटल्यावर ग्रंथलेखनाला सुरवात केली. एका विद्वान रोमन ग्रंथकारानें वयाला सत्तर वर्षें होऊन गेल्यावर ग्रीक भाषेचा अभ्यास करून तींत अनुपमेय प्राविण्य मिळविलें. सर वुइल्यम जोन्स ह्यांचें म्हणणें असें आहे कीं, मनुष्य आपल्या स्मरणशक्तीची नीट जोपासना करील तर तो पाउणशें वर्षांचा झाला तरी केवळ सहा महिन्यांच्या आंत एकादी परकी भाषा आपलीशी करूं शकेल. बुद्धी वाढीचीं अशा प्रकारचीं अनेक उदाहरणें देतां येतील. पण सर्वांत श्रेष्ठ वाढ जी होते ती आत्मीय होय. ह्या वाढीला अंत नसल्यामुळें मनुष्याचा आत्मा अमर आहे, असा तर्क करण्यास भरपूर अवकाश मिळतो. सेंट पॉल हा तरुणपणीं अतिशय क्रूर होता. स्टीफनला दगडांनीं ठार मारण्याच्या कामीं त्यानें पुढाकार घेतला होता. ख्रिस्ताच्या अनुयायांचा छळ करण्यांत तो अग्रगण्य होता. पुढें त्याला साक्षात्कार झाला. आपण करितों हें ईश्वराला मान्य नाहीं अशी त्याची खात्री झाली. हा जो त्याच्या आध्यात्मिक विचारांत फरक झाला, त्यानें त्याच्या जीवनांत क्रांति घडवून आणली. त्यामुळें त्याच्या आंगीं धर्मासाठीं, सत्यासाठीं, तत्त्वपालनासाठीं, आपल्या प्रभुसाठीं वाटेल तो छळ सहन करण्याचें सामर्थ्य आलें. त्यानें ख्रिस्तासाठीं आपलें सर्वस्व, आपले पंचप्राणसुद्धां अर्पण केले. ॲफ्रिकॅनस हा आफ्रिकेंतल्या एका रानटी लोकांचा राजा होता. परमेश्वराच्या प्रेमाची सुवार्ता त्याच्या कानीं पडली. त्याचें अंतर्याम पालटलें. हा नरमांस भक्षण करणारा राजा ख्रिस्तानुयायी झाला अल्पावधींत त्यानें धर्माचा अभ्यास केला. तो विद्वान् व धार्मिक झाला.

त्यानें एका नव्या ख्रिस्ती पंथाची स्थापना केली व व्हिक्टोरिया राणीसमोर उभें राहून तिची मुलाखत घेण्याचेंहि कार्य त्यानें केलें. वाल्या कोळी रस्त्याच्या नाक्यावर झाडाआड लपून जाणाऱ्यायेणाऱ्यांचे खून करून आपलें पोट भरी. असाच एकाचा खून करीत असतां त्यानें सांगितलेल्या एका यःकश्चित् निरोपानें त्याला कृतकर्मांचा पश्चात्ताप झाला व आपल्या पोट भरण्याच्या मार्गाचा हीनपणा त्याच्या नजरेस आला. त्याचें अंतःकरण पालटलें. तो धर्ममार्गाकडे वळला व पुढें रामायणाचा कर्ता वाल्मीकि ऋषि झाला. ही आध्यात्मिक वाढ झालेली पाहिली म्हणजे आपल्या सहज लक्षांत येतें कीं, ईश्वराची लीला अगाध आहे. मनुष्याची आत्मीय वाढ तो कशी व किती करील त्याला अंत नाहीं. पण कोणतीहि वाढ एकदम होत नाहीं, त्याला जाणूनबुजून दीर्घकाल उद्योग करावा लागतो.

## अध्यात्मिक भुकेची शांती

शास्त्रज्ञांचें म्हणणें असें आहे कीं, बाह्य जगांतील वाढीलासुद्धां दीर्घ प्रयत्नांची आवश्यकता असते. साधुसंतांना ज्या उंसाची उपमा देतात, तो ऊंस एका दिवसांत यक्षिणीची कांडी फिरवून तयार झालेला नाहीं. त्याचप्रमाणें आपण आज जीं रुचकर नारिंगें खातों, त्यांची वाढसुद्धां आपोआप व सहजासहजीं झालेली नाहीं. पिढ्यान् पिढ्या गवताची जोपासना केल्यामुळें ऊंस झालेला आहे. दीर्घकाळ काळजी घेतल्यामुळें आंबट व कडवट लिंबांचे संत्रे झालेले आहेत. हल्लींसुद्धां शास्त्रज्ञ वेगवेगळ्या शास्त्रीय शोधांचा उपयोग करून झाडामाडांत, फळाफुलांत कोणीहि कधीं पाहिलेली नाहीं अशी वाढ करीत आहेत. वाढ कशाचीहि असो, तिला कांहीं ठराविक नियम लागू आहेत. शरीराची वाढ होण्याला त्याला अन्नाचा पुरवठा पाहिजे, व्यायाम पाहिजे व विश्रांति पाहिजे. शारीरिक वाढीला जे नियम लागू आहेत तेच आध्यात्मिक वाढीलाहि लागू आहेत. शरीराला भूक लागली म्हणजे आपण अन्न ग्रहण करितों. आध्यात्मिक भुकेचें अन्न सद्वचन व स्वाध्याय हें आहे. विठ्ठलपंत म्हणतात कीं, सद्वचन व स्वाध्याय ह्यांना मी मुकलों म्हणून जन्मास येऊन व्यर्थ गेलों. परमेश्वर इतर प्राण्यांना अन्नाचा पुरवठा स्वतः करितो. त्यांचें काम तें खायचें एवढेंच असतें. मनुष्याला त्यानें बुद्धि दिली आहे, तिचा त्यानें उपयोग केला पाहिजे व आपलें शरीरपोषण करण्यासाठीं व आपली आध्यात्मिक भूक निवारण्यासाठीं अन्न शोधून काढलें पाहिजे. हें आध्यात्मिक क्षुधाशमन करावयाला धर्मग्रंथ वाचले पाहिजेत. आपल्या जीवनाचें चिंतन केलें पाहिजे. आपल्या सभोंवार दिसून येत असलेल्या परमेश्वराच्या सृष्टीचें अवलोकन केलें पाहिजे. सृष्टींत जें परमेश्वराचें स्वरूप दिसतें तें ओळखण्यास शिकलें पाहिजे. असें केलें असतां आपल्या ठिकाणीं सत्य, न्याय, दया, प्रेम इत्यादि दैवी गुणांची वाढ झाल्याशिवाय रह-

णार नाहीं. ह्याप्रमाणें आध्यात्मिक अन्न ग्रहण केल्यावर तें पचवण्यासाठीं व्यायामाची आवश्यकता आहे. तो व्यायाम म्हणजे आपल्याला जें प्राप्त झालें तें दुसऱ्याला देण्याचा प्रयत्न करणें हा होय. ही गोष्ट सर्वांना साध्य नाहीं असें आपल्याला वाटेल. पण आपण ख्रिस्ती धर्मप्रचारक मूडी ह्यांनीं ही असाध्य गोष्ट साध्य कशी केली व ते स्वतः उत्तम वक्ते व शिक्षक कसे झाले हें ज्यांनीं वाचलें असेल त्यांना ह्या प्रकारच्या आध्यात्मिक व्यायामाची आवश्यकता व साध्यता पटल्याशिवाय राहणार नाहीं. "सेवितों हा रस वांटितों आणिकां" हा तुकारामबुवांचा मार्ग ह्याच नमुन्याचा नाहीं काय ? विश्रांति ही वाढीची तिसरी अट आहे. तुकारामबुवा डोंगरांत एकांतांत काळ घालवीत; ख्रिस्त वारंवार विश्रांतीसाठीं गिरिकंदरीं जाई; चार्लस वेल्स्लीनें लंडनला जाण्याचें नाकारून लहानशा खेडेगांवांत आपलें आयुष्य दवडलें; एमर्सननें बॉस्टनला जाण्याचें नाकारलें, तें केवळ आपल्याला विश्रांति मिळावी म्हणून. ही विश्रांति म्हणजे झोंप नव्हे. हा आत्मपरीक्षणाचा काल; ही प्रार्थनेची वेळ. ह्या विश्रांतीच्या वेळीं प्रार्थना करून अधिकाधिक सामर्थ्य प्राप्त करून घ्यावयाचें. प्रार्थना ही आध्यात्मिक क्षुधेची खूण आहे. प्रार्थना म्हणजे आध्यात्मिक क्षुधाशमन आहे. लहान मुलाला भूक लागली म्हणजे तें रडूं लागतें. माझ्या रडण्यानें काय होणार आहे, माझें रडें कोणाला ऐकूं जाईल, रडून माझी भूक कशी थांबेल इत्यादि प्रश्न तें विचारीत नाहीं. आध्यात्मिक भूक लागतांच अशाच प्रकारची आपली स्थिति झाली पाहिजे. आपल्यावर अनेक असह्य प्रसंग येतात; आपल्या आशा भंग पावतात; आपण अडचणींत सांपडतों; दुःखाच्या ओझ्याखालीं दडपून जातों; लोक आपली निर्भर्त्सना करितात व आपला त्याग करतात. अशा प्रसंगीं आपल्या तोंडून सहजासहजीं प्रार्थनेच्या रूपानें परमेश्वराला हांक मारण्याचें कार्य झालें पाहिजे. शीलवर्धनासाठीं प्रार्थनेची आवश्यकता आहे. भरभराटीच्या प्रसंगीं, विजयप्राप्तीच्या वेळींहि प्रार्थना महत्त्वाची असते. साधुसंतांच्या सान्निध्यानें महापातकी प्राणी पवित्र झाल्याचें आपण वाचतों व पहातों. मग त्या साधुसंतांनीं ज्या परमेश्वराची प्रार्थना करण्यांत आपलें जीवन दडविलें त्याची आम्हीं प्रार्थना केली असतां आमचें जीवनहि पवित्र झाल्याशिवाय राहील काय ? संतवचनें जर आम्हांला देवाच्या स्वरूपाचें दर्शन करून देतात, तर प्रार्थनेच्या द्वारें देवाचें दर्शन घेतलें असतां आपला केवढा मोठा लाभ होणार आहे बरें ! आपल्याला वाटतें त्यापेक्षां प्रार्थनेनें मोठीं कार्यें होत असतात. महात्मा गांधी म्हणतात कीं, आपण प्रार्थना केली नसती तर आपल्याला वेड लागलें असतें. परमेश्वरानें ह्याप्रमाणें आपल्या जीवनाचें सार्थक करण्याचें साधन दिलें असून त्याचा आपण उपयोग केला नाहीं तर आमच्यासारखें दुर्दैवी आम्हींच. अलीकडे प्रार्थनेला तुच्छ मानण्याचा प्रघात पडत चाललेला पहावयास सांपडतो. प्रार्थनेंत काय अर्थ आहे, कृति करून

# धर्ममार्गांत तडजोडीची निष्फलता

आपुलें स्वहित करावें पैं आधीं । विचारुनि बुद्धि समाधान ॥ १ ॥
मागें पाहों नये वाट फिरोनियां । दुसरा संगिया साहकारी ॥ २ ॥
आपुलिया बळें घालावि हे कास । न येणेची आस आणिकांची ॥ ३ ॥
तुका म्हणे ब्रह्मरसीं द्यावी बुडी । वासना हे कुडी सांडोनिया ॥ ४ ॥

तुकारामबुवांचा हा अभंग हल्लींच्या समाजसेवेच्या कल्पनेच्या कसाला लावून पाहिला असतां तुकारामबुवा अत्यंत स्वार्थी होते असें कित्येकांना वाटण्याचा संभव आहे. आपलें स्वतःचें हित कशांत आहे, ह्याविषयीं पूर्ण खात्री करून घेऊन तें साधण्याच्या मार्गाला लागावें; स्वहिताचा मार्ग आक्रमित असतां आपल्याला कोणाची सोबत मिळणार कीं नाही हें पाहण्यासाठीं मागें नजर फेंकूं नये; दुसऱ्या कोणाचीहि बरोबर येण्याची अपेक्षा न धरितां स्वतःच्याच बळावर स्वहिताचा मार्ग आक्रमावा, इत्यादि प्रकारचा उपदेश करणें म्हणजे एकंदर जनसमूहाविषयीं आपण अगदीं बेफिकीर आहों असेंच कबूल करण्यासारखें आहे, असें ह्या अभंगावरून अनुमान काढणें चुकीचें होणार नाहीं. पण हें अनुमानच आहे. तुकारामबुवांचें स्वहितसाधनासंबंधाचे ह्यापेक्षां स्पष्टोद्गार आहेत. दुसऱ्या एका अभंगांत ते म्हणतात कीं, धर्ममार्ग आक्रमीत असतां लोकांनीं मला वाईट म्हटलें किंवा माझा छळ केला, माझी निंदा केली, तर त्यांचें मी समाधान कशाला करूं ? त्यांचें समाधान करण्याच्या नादीं लागलों व असें करतांना मी स्वर्ग-सुखाला मुकलों तर लोक मला स्वर्गास घेऊन जातील काय ? किंवा मी त्यांची आराधना केली नाहीं व आपल्याच प्रयत्नानें स्वर्गास जाऊं लागलों तर त्यांच्यानें मला परतवेल काय ? नाहीं. म्हणून मला लोकांशीं कांहीं कर्तव्य नाहीं. माझें हित मला स्वत:लाच साधलें पाहिजे. ह्या दोन्ही अभंगाचा अगदीं स्पष्टपणें अर्थ करावयाचा म्हणजे, धर्ममार्गांत लोकांची आराधना करून त्यांना आपल्या बरोबर नेऊं, अशी हांव धरणें किंवा अपेक्षा करणें चुकीचें आहे. धर्ममतें किंवा समजुती ह्यासंबंधीं तडजोड करणें निष्फल आहे, म्हणून ती कोणीहि करूं नये, असें तुकारामबुवांचें निक्षून सांगणें आहे. ही

---

दाखवा असे उद्गार काढलेले ऐकूं येतात. कृति तर केलीच पाहिजे. पण ती योग्य प्रकारची व्हावी व ती करण्यास बल प्राप्त व्हावें ह्यासाठीं प्रार्थनेची आवश्यकता आहे. देवालय हें पॉवर हाऊस आहे. प्रार्थनेमुळें दैवी चमत्कार घडून येतील अशी कोणाची अपेक्षा नसते, पण तिच्यामुळें आपल्याला अद्भुत शक्ति प्राप्त होऊन आपल्या मनो-वृत्ति सुमार्गाला लागतात व सदाचरणीं रत राहून मोहाला बळी न पडतां आपल्याला जीवन सफल करणें शक्य होतें व सुकर होतें.

त्यांच्या अनुभवाची गोष्ट आहे व म्हणून ह्या त्यांच्या सांगण्यांत आपलपोटेपणा किंवा स्वार्थ नसून केवळ सत्यार्थ मात्र भरलेला आहे हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे.

## धर्ममार्गांत तडजोड नको

जेव्हां जेव्हां सुधारणेला सुरवात होते, मग ती सुधारणा धार्मिक असो किंवा सामाजिक असो, ती घडवून आणणाऱ्यांचे स्वाभाविकतःच दोन वर्ग होतात. कांहीं लोकांना असें वाटतें कीं, सुधारणा लवकर होईल तितक्या मोठ्या प्रमाणावर व्हावी, व ती घडवून आणण्याला ते आपलें सर्व तनमनधन खर्ची घालण्याला तयार असतात. अशा लोकांना उतावळे सुधारक म्हणतात. दुसरे कित्येक लोक असतात त्यांनाहि सुधारणा इष्ट असते, परंतु ती सावकाशपणें व्हावी अशी त्यांची इच्छा असते. सुधारणा झपाट्यानें झाली असतां राष्ट्राचें राष्ट्रीयत्व नाहींसें होईल, लोकांचा आपलेपणा नष्ट होईल अशी त्यांना भीति वाटते. ह्यासाठीं हे थंडे सुधारक उतावळ्या सुधारकांच्या उत्साहाचा भंग करून त्यानीं करूं घातलेल्या सुधारणेचा वेग कमी करण्याचा प्रयत्न करितात. ह्या दोन वर्गांच्या बाहेरचे जे लोक त्याना सुधारणा व्हावयाला पाहिजे असते किंवा नको हें जरी खात्रीपूर्वक सांगता येणें कठीण असलें, तरी इतकी गोष्ट खरी कीं, ते आपण सुधारणेच्या विरुद्ध आहों व सुधारणेला विरोध करण्यांत आपण धर्माचें रक्षण करीत आहों असा जनतेचा समज करितात व ह्या रीतीनें साधारण मनुष्याला अत्यंत प्रिय जी लोकप्रियता ती सहजणें प्राप्त करून घेतात. उत्साही सुधारकांच्या मार्गांत थंड्या सुधारकांकडून व धर्मरक्षकांकडून ह्याप्रमाणें विघ्नें येत गेल्यानें सुधारणेचा वेग कमी होतो. त्यामुळें कित्येक वेळां सुधारणेचें पाऊल पुढें पडेल कीं नाहीं ह्याविषयींहि त्यांना संशय येऊं लागतो व ते इच्छित कार्य कसेंतरी करून सिद्ध व्हावें, म्हणून सुधारणेच्या शत्रूंशीं तडजोड करण्यास प्रवृत्त होतात. पण ह्या तडजोडीविषयीं असा सार्वत्रिक अनुभव आहे कीं, ती करण्यांत जो हेतु असतो तो ती केली असतां अगदीं निष्फळ होतो. म्हणून तुकाराम बुवांसारखे साधु अगदीं निक्षून सांगतात कीं, कांहीं होवो, धर्ममार्गामध्यें तडजोडीच्या भानगडीस लागू नका.

## विविध पक्ष

व्यवहारांत तडजोड करणें पुष्कळदां जरुरीचें असतें, इतकेंच नव्हे तर आमच्या आयुष्याचा बराच भाग व्यावहारिक तडजोडी करण्यांतच खर्च होत असतो. परंतु धर्म म्हणजे सत्याचा मार्ग व सत्याशीं तडजोड करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे असत्याचा आश्रय करणें होय. धार्मिक व सामाजिक बाबतींत तडजोड केली असतां सुधारणेचें पाऊल पुढें कसें पडत नाहीं ह्याचे उदाहरण पाहिजे असल्यास आमच्या इलाख्यांतील सुधारणेचा इतिहास पहावा. सुधारणा सर्वसाधारण लोकांना बरोबर घेऊन करा असें

म्हणणारा एक पक्ष आपल्यांत होऊन गेला. त्याचा समज व म्हणणें असें असे कीं, लघुतम प्रतिकाराच्या मार्गानें सुधारणा ( Reform along the lines of least resistance ) केल्यानें ती यशस्वी होईल. लोकसमूहाला न विचारतां झपाट्यानें सुधारणा करण्याचा प्रयत्न केला असतां तो निष्फळ होईल, इतकेंच नव्हे तर त्यापासून समाजांत फाटाफूट होऊन सामाजिक व राजकीय दुष्परिणाम घडतील. दुसऱ्या प्रकारच्या विचारसरणीचा जो पक्ष होता त्याचें म्हणणें सुधारणा करावयाची ती लोकसमूह तिला प्रतिकार करील कीं काय, इकडे लक्ष न देतां सत्याला, विवेकाला व न्यायाला पटेल म्हणजे On rational lines करावी. थोडीबहुत सुधारणा झालेली जी आपण पहात आहों ती कशी झाली ह्याचा विकारवश न होतां ज्या कोणीं विचार केला आहे त्याला दुसऱ्या प्रकारच्या विचारसरणीच्या गृहस्थांचें म्हणणें खरें होतें हें स्पष्टपणें कळून चुकलें आहे. पन्नास कुटुंबें जातिभेद मोडण्यास तयार होतांच आपणहि त्यांना जाऊन मिळूं, म्हणजे सुधारणामार्ग क्रमण्याचें काम पुष्कळजण मिळून करूं, म्हणजे सुधारणेच्या बाबतींत लोकांशीं तडजोड करून ती घडवून आणूं, असें जे कोणी म्हणत ते स्वतः जातीच्या बाहेर केव्हांहि पडले नाहींत. जगामध्यें जे अनेक धर्म प्रचलित आहेत त्यांच्या स्थापकांच्या चरित्राचा व त्यांनीं स्थापिलेल्या धर्मांच्या वाढीचा विचार केला तरी हेंच स्पष्ट होतें कीं, ज्या कोणीं धर्मासंबंधानें तडजोड करण्याचें नाकारलें, लोकनिंदा, लोकछळ इत्यादिकांकडे पूर्ण दुर्लक्ष करून विवेकाला पटणारी तत्त्वें परमेश्वराला साक्षी ठेवून, त्याच्यावर सर्व भारिभार ठेवून, बेधडक लोकांपुढें ज्यांनीं मांडलीं त्यांनाच स्वीकृत कार्यांत यश आलें. परंतु ज्यांनीं लोकांना आवडेल तितकाच आपल्या धर्ममताचा भाग त्यांच्यापुढें मांडला, म्हणजे ज्यांनीं आपल्या धर्ममतांचें नाटक घातलें ते केव्हांहि यशस्वी झाले नाहींत.

## दुटप्पी वर्तन नसावें

आमच्या देशांत हल्लीं धर्म व समाजसुधारणामतांचें बऱ्याच मोठ्या प्रमाणावर नाटक चाललें आहे असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. इंग्रजी शिक्षणाला आमच्या देशांत सुरवात झाल्यापासून आमच्या धार्मिक व सामाजिक सुधारणेच्या कल्पनांत विलक्षण क्रांति घडून आलेली आहे. पण आपलीं उदार किंवा विकसित झालेली मतें लोकांपुढें जशीच्या तशी ठेवण्याचें काम किती थोड्या लोकांच्या हातून होत आहे बरें! धर्मरक्षकाचें सोंग घेऊन पुष्कळ सुशिक्षित लोक आपली मतें लपवून ठेवीत नाहींत काय? हें धर्माचें नाटक पहावयास फार लांब जावयास नको. चंद्र व सूर्यग्रहणें हीं परमेश्वरानिर्मित नियमाला अनुसरून चंद्र, सूर्य व पृथ्वी फिरत असल्यामुळें होतात; त्यांच्याशीं राहुकेतूंचा कांहीं संबंध नाहीं. ग्रहण लागलें असतां समुद्रस्नान केल्यानें तें सुटतें व न केल्यानें तसेंच चालू रहातें अशांतला प्रकार नाहीं.

ह्या गोष्टी बारा चौदा वर्षांच्या शाळेत जाणाऱ्या प्रत्येक मुलास माहीत असतात. परंतु कधी कधीं जेव्हां चंद्रास व सूर्यास ग्रहण लागतें, तेव्हां समुद्रस्नानाला गेलेल्या मंडळींत युनिव्हर्सिटीच्या एकेक दोन परीक्षा पास झालेलें लोक असतात ! ह्या त्यांच्या कृत्याला धर्माचें नाटकच म्हणावयाचें नाहीं काय? त्याचप्रमाणें आमची राष्ट्रीयत्वाची भावना दृढ झाली पाहिजे व ती तशी व्हावयाला जातिभेद नष्ट होणें अत्यंत जरूर आहे हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट दिसत असतांहि, जातीजातींत लग्नें व्हावी असें कोणी म्हणतांच 'अब्रह्मण्यम् अब्रह्मण्यम्' अशी ओरड करावयाची व जातिभेदाच्या उच्चनीचत्वाच्या भ्रामक, भेदक व भेकड कल्पनांना आपल्या मनावर साम्राज्य करूं द्यावयाचें, हेंहि सामाजिक सुधारणेचें नाटकच होय ! आपल्याला सोईची असतील तितकीच सुधारणामतें ग्राह्य करावयाचीं, ह्यांतही नाटकी भाग कमती आहे असें नाहीं. ख्रिस्ती धर्माचा यहुदी लोकांत जेव्हां प्रसार होऊं लागला तेव्हां मूर्तिपूजा करणें, देवाला बळी देणें इत्यादि कल्पना अयोग्य असें पुष्कळ यहुद्यांना वाटे. ते स्वतः देवळांत जाऊन मूर्तींना नमन करीत नसत, परंतु दुसऱ्यांना दक्षिणा देऊन ही कामें करवीत व आपण जुन्या धर्माप्रमाणें वागत आहों, असें जनतेस भासविण्यासाठीं रोमन अधिकाऱ्यांपासून दाखले ऊर्फ सर्टिफिकेटें घेऊन ठेवीत. आमच्या येथेंहि, संध्या करण्यांत अर्थ नाहीं, सोंवळें नेसण्यांत अर्थ नाहीं, त्याचप्रमाणें देवाची पुजा मानससुमनानें केली पाहिजे हें अवगत असून किती लोक संध्येचा, सोंवळें नेसण्याचा, ब्राह्मणांना दक्षिणा देऊन देव्हाऱ्यांतले देव धुवविण्याचा म्हणजे देवपूजेचा फार्स करतात बरें ! आपलीं खरीं मतें दाबून ठेवून लोकांना रुचतील तितकींच त्यांच्यापुढें मांडण्याचें म्हणजे लोकाराधनेचे प्रकार सुशिक्षितांकडून जोंपर्यंत केले जातील, तोंपर्यंत सुधारणेच्या कार्यांत आपल्याला अपयश आलें तर त्यांत आश्चर्य मानण्यासारखें कांहीं नाहीं.

## धर्माच्या बाबतींत सरळ वर्तन

हें धार्मिक व सामाजिक सुधारणेचें नाटक आतांच घातलें जात आहे व प्राचीन काळीं घातलें जात नसे असें नाहीं. ह्या नाटकाचे प्रयोग वारंवार होत असतात. रे. हारग्रेव्ह साहेबानीं आपल्या Limits of Compromise ह्या विषयावरील सुंदर लेखांत सॉक्रेटिस, सिसरो, एपिक्टेटस व सेनेका ह्यांच्यासारख्या मी मी म्हणणाऱ्या तत्त्वज्ञान्यांनींसुद्धा धर्माच्या नाटकांत भूमिका घेतल्याचें स्पष्ट करून दाखविलें आहे. परंतु धर्माची त्यावेळची कल्पना काय होती हें लक्षांत आणलें असतां ह्या मोठमोठ्या लोकांनीं धर्माचरण करीत असतां ढोंगाला त्यांत स्थान दिलें, हें त्यांचें कृत्य क्षम्य होतें असेंच आपणांला म्हणावें लागतें. त्यांच्या काळीं व्यक्तीला आपल्या धर्मकल्पना आचरण्याची मुभा नसे. धर्मकल्पनेमध्यें राष्ट्राच्या सुखदुःखाचा अंतर्भाव होई, त्यामुळें व्यक्तींना राष्ट्राचें सुख ज्यायोगें वृद्धिंगत् होईल अशाच प्रकारचें आपलें धार्मिक वर्तन ठेवावें लागे. तुकाराम-

बुवांनीं स्पष्टपणें सांगितल्याप्रमाणें हल्लींची धर्मासंबंधाची कल्पना वैयक्तिक आहे. मी व माझा देव ह्यांचें जें नातें व माझ्या देवासंबंधानें माझें जें कर्तव्य, तो माझा धर्म. त्याच्याशीं दुसऱ्या व्यक्तीचा, व्यक्तिसमुदायाचा, देशाचा किंवा राष्ट्राचा कोणत्याही प्रकारचा संबंध नाहीं. ही हल्लींची धर्मकल्पना आहे. ती आम्हांला मान्य असल्यामुळें आमचा धर्म लोकापवादाला न भितां आम्हीं उघड उघड आचरावा हें आमचें कर्तव्य आहे. हें कर्तव्य बजावण्याचें काम आमच्या हातून झालें नाहीं, व कांहींहि संयुक्तिक किंवा अयुक्तिक सबबी सांगून जर आम्हीं तें करण्याचें टाळलें तर आमचें वर्तन केव्हांहि क्षम्य होणार नाही. घरच्या अडचणींच्या नांवावर किंवा देश किंवा राष्ट्रहिताच्या सबबीवर जे कोणी कर्तव्यपराङ्मुख होतात ते आपली स्वतःची अवनति करून घेतात इतकेंच नाहीं, तर ज्या राष्ट्राची आपल्याला फार काळजी आहे असें ते मानतात त्याचीहि नैतिक अवनति करण्याला मदत करीत असतात.

ह्यासाठीं धर्माच्या बाबतींत आमचें वर्तन नेहमीं सरळ असावें. आमचीं जी धर्ममतें असतील, ज्या मतांचा आपल्या मनाला साक्ष ठेवून आपण अंगीकार केला असेल, त्यांच्याविरुद्ध जाणून बुजून आमचें वर्तन कधींही होऊं नये. ती लोकांच्यापुढें जशींच्या तशीं मांडलीं जातील ह्याविषयीं आपण विशेष खबरदारी घ्यावी. शब्दानें, कृतीनें किंवा स्तब्ध राहण्यानें दुसऱ्यांचा गैरसमज होऊं देणें म्हणजे लबाडी करणें होय.

त्याचप्रमाणें धर्मासंबंधानें विचार करण्याचें सोडूं नये. विचारांतीं आपलीं मतें कदाचित् बदलतील व बदललेलीं मतें आचरतांना आपण लोकनिंदेला पात्र होऊं म्हणून धर्माविषयीं उदासीनता धारण करणें म्हणजे असत्याची मैत्री करणें होय.

साधारण जनतेला न रुचणारीं मतें प्रतिपादणें व आचरणें हें काम कठीण आहे. त्यामुळें लोकांकडून आपला छळ होईल हें खरें. परंतु आपलीं मतें झांकून ठेवून लोकांना आवडेल, अशा प्रकारचा वागण्याचा प्रयत्न केला असतां आपला कमी छळ होईल असें कोणाला वाटतें काय? पुष्कळ वेळां लोकनिंदा सहन करवते, परंतु आपल्या हातून व्हावें तसें वर्तन न झालें म्हणजे, मनाची जी टोंचणी सुरू होते ती सहन करणें दुरापास्त होतें. लोकछळापेक्षां स्वतःच्या मनाचा छळ मोठा असह्य असतो. शिवाय लोकछळ हल्लीं तरी पूर्वीच्याप्रमाणें भयंकर नसतो, हेंहि आपण विसरतां कामा नये. इतकें असून लोकापवादाला भिऊन जे कोणी स्वधर्ममताची आहुति देण्यास तयार होतात, त्यांनीं आपल्या विवेकाला दाबून टाकण्याच्या कामांत बरेंच यश संपादिलें आहे असें म्हणणें भाग आहे. आमचें ह्या बाबतींतलें कर्तव्य अगदीं स्पष्ट आहे. कांहींहि होवो, आम्हीं सत्याची अवहेलना करतां कामा नये. पण आपलेंच वर्तन जर दुटप्पीपणाचें असेल, आपलेंच नाणें खोटें असेल, तर लोकांनीं आमची निंदा केली तरी ती शांतपणें आम्हांला सहन केली पाहिजे!

———


# विश्रांतीची शांति

विश्रांतीची शांति तुझे पायांविण । न होयाचि जाण देवराया ॥
कोटी कल्पवरी उपाय साधनें । केलियाही तेणें सुख नोहे ॥
सुखाचें जें सुख अखंड अपार । जेथें मुनीश्वर रमताती ॥
तुका म्हणे माझ्या जीवींच्या जीवना ॥ दावींहो चिद्धना पाउलें तीं ॥

सर्व दिवसभर परिश्रम करून मनुष्य थकला भागला म्हणजे त्याला विश्रांतीची आवश्यकता भासते. थोडा वेळ तरी प्रत्यक्ष कामापासून दूर रहावें इतकेंच नव्हे तर कामाचा विचारहि विसरून जावा, शांतिसुख उपभोगावें अशी त्याला सहाजिकच इच्छा होते. श्रम करून थकवा आला असतां अशी इच्छा होणें स्वाभाविक आहे; परंतु कोणत्याहि प्रकारचे-शारीरिक, मानसिक-कष्ट न करितां विश्रांतीची अपेक्षा करणारे लोक कांहीं थोडे नसतात. श्रम केल्याविना रोजमुरा मिळत नाहीं हें जसें खरें आहे, त्याप्रमाणेंच काबाडकष्ट केल्याशिवाय खरी विश्रांतीहि प्राप्त होत नाहीं, हें अबाधित तत्त्व अशा मनुष्यांच्या लक्षांतहि येत नाहीं. विश्रांतीची खरी किंमत श्रम करणाऱ्यांनाच करितां येते, ती आळसांत वेळ दडवणाऱ्यांना करतां येणें शक्य नाहीं.

परंतु विश्रांति म्हणजे श्रमापासून मुक्तता ही तिची खरी कल्पना नव्हे. खरी विश्रांति सतत कर्म करण्यांतच असते. तें करीत असतां शरीराचे, मनाचे व आत्म्याचे व्यापार अबाधितपणें चालणें, ह्यांतच विश्रांतीचें कार्य होतें. दोघा चित्रकारांना शांतीचें चित्र काढावयाचें होतें. एकानें बराच वेळ विचार करून एका सरोवराचें चित्र काढलें. त्या सरोवराचें पाणी अगदीं हालत नसून त्याच्या कांठावरचीं झाडें, झुडपें तटस्थ असलेलीं अशी दाखविलेली होतीं. चित्राचा एकंदर देखावा इतका स्तब्धतेचा होता कीं पाणी, झाडें, झुडपें व त्यांच्यावर बसलेले पक्षी ह्यांच्यांतून प्राण निघून गेल्याचा भास होत होता. एवढेंच नव्हे तर त्या सरोवरांतल्या होड्यांत बसून मासे धरीत असलेले धीवर पाण्यांत जाळीं सोडून उभ्यानेंच झोंपी गेले असावे, असा पहाणाऱ्याला भास होई. दुसऱ्या चित्रकाराचें चित्र ह्याहून अगदीं वेगळें होतें. त्यानें आपल्या चित्रांत एका धबधब्याचें पाणी पुष्कळ उंचावरून पडत आहे व त्याचे तुषार आसपासच्या झाडांवर जोरानें उडत आहेत; त्यांतल्या एका झाडावर एक पक्षी आपलें घरटें करून त्यांत आपल्या

पिलांना पंखाखालीं घेऊन शांतपणें बसला आहे असें दाखविलें होतें. धबधब्याचा एकसारखा आवाज होत असून, पाण्याचे तुषार जोरानें उडत असून, तो पक्षी त्या भयप्रद स्थितीला न भितां पूर्णपणें विश्वासानें स्वस्थपणें आपलें काम करीत होता ह्यांत जी शांतीची कल्पना मूर्त करून दाखविली गेली तीच कल्पना होय. खरी शांति परमेश्वर प्राप्तीशिवाय होत नाहीं. शांति मिळविण्यासाठीं आमचे सर्वांचे प्रयत्न चाललेले असतात. परंतु आम्हांलाहि पहिल्या चित्रकाराप्रमाणें शांतीची योग्य कल्पना झालेली नसते. आम्हांला केवळ शांति नको, विश्रांतीची शांति पाहिजे. विश्रांति मिळावी म्हणून अव्याहत श्रम केले पाहिजेत. ह्या जगांत आपण आहों तों सत्कर्म करूं, म्हणजे पुढें जेथें श्रम करावे लागत नाहींत, स्तब्ध बसून सुखोपभोग घ्यावयास मिळतो, अशा स्वर्गाच्या राज्यांत जाऊन आपण वस्ती करूं, अशी किंवा अशा प्रकारची ज्यांची मोक्षाची कल्पना, ते शांतिसुखाला मुकले असे समजावें. परमेश्वराच्या पायांशिवाय शांतिसुख नाहीं हें जर खरें आहे तर तें प्राप्त करून घेण्याचा आपण अविश्रांत प्रयत्न केला पाहिजे. परमेश्वराचें प्रत्यक्ष दर्शन व्हावयाला जो उपाय, त्या उपायाची, शांति मिळविण्याच्या कामीं आपण योजना केली पाहिजे. त्यावर दृढ विश्वास ठेवून, मनाच्या स्थितीची चलबिचल घडवून आणण्यासारख्या ज्या गोष्टी आपणां-सभोंवार नेहमीं घडून येत असतात, त्यांकडे दुर्लक्ष करून आपलीं सुखदुःखें विसरून, आपण स्वकर्तव्यांत मग्न होऊन राहूं तर आम्हांला शांतिसुख प्राप्त होणार नाहीं काय? ह्याच्या उलट आपल्या मोहरीएवढ्या गैरसोयींचा सहन कराव्या लागणाऱ्या बारीकसारिक दुःखांचा, आमच्यासंबंधानें उत्पन्न होणाऱ्या गैरसमजांचा पर्वत करून करून, त्या पर्वताला भिऊन जर मनाला व्यर्थ शीण देऊं तर शांतिसुख आम्हांला कसें प्राप्त होईल बरें! विश्रांतीची शांति मिळविण्याला एकच उपाय आहे. त्याच्याच अवलंबनावर आमचें शाश्वतचें हित अवलंबून आहे. तो उपाय म्हटला म्हणजे न भितां, न डगमगतां, कितीही त्रास झाला, संसारांत कितीही सुख-दुःखें प्राप्त झालीं तरी तीं सर्व आमच्या उन्नतीचीं साधनें आहेत, त्यांच्यामुळेंच आम्हांला खरी शांति, खरा मोक्ष, खरा स्वर्ग प्राप्त होणार आहे, अशी दृढभावना असणें हा होय. ही भावना अधिकाधिक आमच्याठायीं दृढ करण्याचा आम्हीं प्रयत्न केला पाहिजे.



# श्रीसाईनाथ हॉस्पिटल, शिर्डी

## मुंबई ऑफिसांत हॉस्पिटल फंड जमा

### ( दि. १-१२-६४ ते ३१-१२-६४ )

### रोखीनें आलेली रकम

| नांव | गांव | रु. | पैसे |
|---|---|---|---|
| साईसेवक | मुंबई | ५ | ०० |
| मे. गोल्ड सोप कं. | मुंबई | २१ | ०० |
| मे. म्युचवल बेनीफीट सो. | मुंबई | ५ | ०० |
| श्री. एस्. एच्. तिरोडकर | मुंबई | ११ | ०० |
| ,, व्ही. एन्. राजा | मुंबई ४ | २५ | ०० |

### चेकनें आलेल्या देणग्या

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. सी. डी. अमीन | किसुमू | ५०० | ०० |
| ,, आर. एच्. टिपणीस | बल्ली | ११ | ०० |
| ,, व्ही. पी. शर्मा | नैरोबी | १०१ | ०० |
| ,, रसीक शहा | मुंबई | ५१ | ०० |
| ,, आर. एम्. वकील | मुंबई ६ | १७१ | ०० |
| ,, के. एस्. बुचीया | अलाहाबाद | २०० | ०० |
| ,, एच्. एस्. शर्मा | यादगिरी | ५०० | ०० |
| ,, एम्. टी. सिंघ | मुंबई ६४ | १०१ | ०० |
| ,, एम्. पी. सुब्रमण्यम | मद्रास २३ | २५ | ०० |
| ,, पी. बी. देसाई | अहमदाबाद | २५ | ०० |
| ,, एस्. एन्. श्रीनिवासन | सालेम | ५० | ०० |
| ,, व्ही. एन्. हळबे | ल्युगाझा | ५१ | ०० |

### त्रि. पी. ओ. नें आलेले

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. गुलझार हबीबभाई | कंपाला | ३४ | ०० |
| श्रीमती कुसुमबेन इ. पटेल | ,, | १७ | ०० |
| श्री. एम्. ए. अदीया | मोरोगीनी | २० | ०० |
| ,, नागर मकनजी | आरोखा | ४० | ०० |
| ,, डी. जे. देसाई | कंपाला | १२ | ०० |
| ,, के. ए. वैद्य | नाकुरू | १२ | ०० |

## दि. १-१२-६४ ते ३०-४-६५ अखेर भक्तांनीं रोखीने दिलेल्या देणगीची यादी

| नांव | गांव | रु. | पैसे |
|---|---|---|---|
| श्री. मनसुखानी के. एल. | — | ५ | ०० |
| ,, पंडीत के. ए. | मुंबई | ४० | ०० |
| ,, पाध्ये आर. एम्. | ,, | १० | ०० |
| मि. अँड मिसेस टी. सुंदरी | ,, | ५१ | ०० |
| ,, एस्. अरुणकुमार | ,, | ३० | ०० |
| ,, पटेल ए. एन्. | अहमदाबाद | १०१ | ०० |
| ,, सोनी जी. एम. | नांदेड | १० | ०० |
| रतनबाई | मुंबई | ५ | ०० |
| मिस्त्री ब्रदर्स | ,, | १५ | ०० |
| श्री. दवे आर. के. | ,, | २५ | ०० |
| डॉ. एम्. एल्. पवार | इ. करंजी | ५ | ०० |
| श्री. कुकदम्मा एन. के. | नागपुर | २५० | ०० |
| ,, लवंगीया एच. टी. | पोरबंदर | ३३ | ०० |
| ,, एम. बी. उमरावला | मुंबई | २१ | ०० |
| ,, जी. आर. पटेल | पोरबंदर | ११ | ०० |
| ,, एम्. मधुभाई | मुंबई | ११ | ०० |
| ,, साई भक्त | ,, | २४ | ०० |
| ,, बी. जे. चवाडीया | ,, | १०१ | ०० |
| ,, दिलीप | कुर्ला | २१ | ०० |
| ,, रमणीकलाल चवाडीया | — | ५ | २५ |
| ,, डी. पी. ठक्कर | भिवंडी | ५ | २५ |
| ,, व्ही. एन. मेहता | मुंबई | २१ | ०० |
| ,, बी. एन. कोठारी | ,, | २१ | ०० |
| मिसेस एन. सी. | ,, | ११ | ०० |
| श्री. बिलाजी | ,, | ५ | ०० |
| ,, जे. बी. बआबी | पुणें | ५१ | ०० |
| ,, दौलतराम | पुणें | ५१ | ०० |
| ,, के. पी. शिथवा | मुंबई | १६ | ०० |
| श्री. डॉ. बी. के. बॅनर्जी | मुंबई | १५ | ०० |
| ,, मोहिनीभॉय | ,, | ५१ | ०० |
| ,, सी. व्ही. मोरारजी | ,, | ५ | २५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ,, | आर. के. शहापूरजी | ,, | ५ | २५ |
| ,, | सुंदर व्ही. | ,, | २५ | ०० |
| ,, | ए. पटेल | ,, | ५ | ०० |
| ,, | साई भक्त | — | ८९ | ०० |
| ,, | कापडीया एच. जी. | ,, | २१ | ०० |
| ,, | प्रवीण शहा | ,, | १०१ | ०० |
| ,, | गणपतराव पवार | — | २५ | ०० |
| ,, | के. जी. नरीमन | मुंबई | २५ | ०० |
| ,, | ए. के. मुदलीयार | सि. बाद | १०१ | ०० |
| ,, | एच. एन्‌ मुजुमदार | मुंबई | १ | २५ |
| | पुष्पा | ,, | १ | २५ |
| ,, | एच. जी. शहा | ,, | १ | २५ |
| ,, | एन्. बी मेहता | ,, | ५ | ०० |
| ,, | मास्टर टिंकू—एम्. | ,, | २५ | ०० |
| ,, | मास्टर | ,, | ५ | ०० |
| ,, | जी. रावल | ,, | ११ | ०० |
| ,, | के. वेंकटेघर राव | राजमुंद्री | १० | ०० |
| ,, | साई भक्त | मुंबई | १८१ | ०० |
| ,, | अमृतलाल | ,, | ३० | ०० |
| ,, | नंदनलाल | कलकत्ता | २२ | २५ |
| ,, | एच. आर. पटेल | नौरोकी | १०० | ०० |
| ,, | बी. जी. पटेल | ,, | १० | ०० |
| ,, | एस्. एम्. कोठारी | मुंबई | ११ | ०० |
| | सौ. दुर्गाबाई | ,, | ५० | ०० |
| | इन्दु नाडकर्णी | ,, | १३ | ७५ |
| | सुधा | ,, | ५ | ०० |
| श्री. | ए. के. देसाई | बडोदा | १०० | ०० |
| ,, | साईभक्त | — | १०१ | ०० |
| ,, | एस. पी. वदवा | मुंबई | ५१ | ०० |
| ,, | एल. एन्. गोयेल | ,, | ६० | ०० |
| ,, | डॉ. पी. डी. सॅम्सन | ,, | ५०१ | ०० |
| ,, | मिसेस सुधा रेगे | ,, | १० | ०० |
| ,, | साईभक्त | ,, | ५१ | ०० |
| ,, | व्ही के. शहा | ,, | १०१ | ०० |
| ,, | जी. ए. भाटे | ,, | ५० | ५० |

| | | | |
|---|---|---|---|
| ,, सी. पी. पटेल | ,, | १०१ | ०० |
| ,, व्ही. के. मिस्त्री | ,, | १०१ | ०० |
| ,, एच. बाटलीवाला | — | ११ | ०० |
| ,, वसंत | मुंबई | ५ | ०० |
| ,, लीला गंगोळी | ,, | १० | ०० |
| ,, आर. के. दवे | — | २५ | ०० |
| ,, मिस्टर अँड मिसेस प्रताप ठक्कर | मुंबई | १०१ | ०० |
| ,, भंडारे | ,, | १०१ | ०० |
| ,, सोहराबजी | ,, | १० | ०० |
| ,, आर. बी. शहा | ,, | ५१ | ०० |
| ,, मिसेस पी. एम. मेहता | ,, | ५१ | ०० |
| ,, मिस. जे. राव | | १० | ०० |
| ,, दीपक पी. | मुंबई | १०० | ०० |
| ,, एम. टी. इडींकल | पुणें | ५० | ०० |
| ,, पी. टी. सामंत | मुंबई | १०१ | ०० |
| ,, दामप्रभा महाराज | वाघोली | २ | ०० |
| ,, एस. एन्. आचार्य | औरंगाबाद | ५ | ०० |

## हॉस्पिटल फंडासाठीं म. ऑ. आलेल्या देणग्या

### ता. १।१२।६४ ते ३०।४।६५ अखेर

| नांव | गांव | रु. | पैसे |
|---|---|---|---|
| श्री. एच्. जे. शहा | मुंबई | ५० | ०० |
| ,, पी. आनंद राव | सिकंदराबाद | २५ | ०० |
| ,, पी. व्ही. रुसतोमजी | नाशिक | ३५ | ०० |
| ,, एस्. जे. शहा | मुंबई | ३६ | ०० |
| ,, जी. एम्. हिंगोप्पा | बेंगलोर | २५ | ०० |
| ,, कान्तीलाल सोपनदास | बीकानेर | २५ | ०० |
| ,, का. त्र्यं. वाणी | ओतुर | ५१ | ०० |
| ,, राम | इंदोर | ६ | ०० |
| कु. मीना बीसवास | नवी दिल्ली | ५१ | ०० |
| ,, बी. जी. | मीहाबक | १०० | ०० |
| सौ. एल. बी. सुळे | ठाणा | २५ | ०० |
| श्री. के. सी. व्ही. रामा | आनंतपूर | २११ | ०० |


| | | | |
|---|---|---|---|
| ,, एस. व्ही. पाटील | बांडइ | ५० | ०० |
| ,, बी. एम्. देसाई | मुंबई | १०० | ०० |
| ,, जी. व्ही. जोशी | ,, | ५१ | ०० |
| ,, डी. आर. गांधी | ,, | १०१ | ०० |
| ,, एम्. एल. इसवार | ,, | ५० | ०० |
| ,, एन्. डी. वयोस | ,, | ५१ | ०० |
| ,, के. आनंद रॉय | घाडवाड | ५ | ०० |
| कु. एन्. ए. कुळकर्णी | मुंबई | ५ | ०० |
| ,, एस. दोगनकट | रायपूर | ५ | २५ |
| श्री. ए. आर. चित्रे | नागपूर | ५० | ०० |
| ,, सी. एम्. कुलकर्णी | बेंगलोर | २०० | ०० |
| सौ. के. ए. पारके | नागपूर | ५ | ०० |
| श्री. आर. ए. साथी | मुंबई | २१ | २५ |
| ,, जे. डी. नाईक | ,, | १०० | ०० |
| ,, टी. आर. मोह | मद्रास | ५१ | ०० |
| ,, बी. व्ही. पटेल | बाबले | ९५ | ०० |
| ,, एम्. रामानी | दुर्गापूर | ५१ | ०० |
| सौ. बी. मीनारॉय | नागपूर | ७२ | ०० |
| श्री. पी. व्ही. रुस्तोमजी | नाशिक | ६० | ०० |
| ,, बी. एम्. नरसीमाह | बेंगलोर | १०१ | ०० |
| ,, डी. डी. राजपुत | आवजड | ११ | ०० |
| ,, के. प्रेमनारीन | नवी दिल्ली | ५१ | ०० |
| ,, एस्. व्ही. शर्मा | कालया | १० | ०० |
| ,, एल. डब्यु. कंपनी | मद्रास | २०० | ०० |
| ,, पी. के. कालेकर | मुंबई | ५ | ०० |
| ,, जी. जे. दांडेकर | कुलाबा | १०० | ०० |
| ,, बी. खिदानीह | बेलपेठ | १२० | ०० |
| ,, एम्. व्ही. | देहराडून | २० | ०० |
| सौ. के. वाघमारे | दुरबान | २६ | ५० |
| ,, एस्. के. देसाई | मालाड | १०१ | ०० |
| श्री. ए. एच्. मेहता | मुंबई | ५१ | ०० |
| ,, एस्. मुकरजी | नागपूर | २६ | ०० |
| ,, राम | इंदोर | ६ | ०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ,, एस्. बी. जरानी | बॅंगलोर | १२ | ०० |
| ,, ओ. जी. कृष्णा | टेरुपायड | ५१ | ०० |
| ,, एम्. जे. डीवाड | मुंबई | ५१ | ०० |
| ,, एम्. एम्. आजया | नवी दिल्ली | ५० | ०० |
| ,, जे. एस्. पटेल | नादीड | ७५ | ०० |
| ,, पी. व्ही. रुसतुमजी | नाशिक | २०२ | ०० |
| ,, एस्. पी. देशपांडे | येक्को रेड्डी | १० | ०० |
| ,, मनुराज किरपकर | मुंबई | ९ | ०० |
| ,, ए. बी. पाटील | मंगोली | ७ | ०० |
| ,, जे. जे. बांदेकर | मुंबई | ५ | ०० |
| ,, एन्. एम्. ठाकर | जमसतपूर | १०० | ०० |
| ,, लोरेनज्गे वॉच कंपनी | मद्रास | १०० | ०० |
| श्री. रामन | इंदोर | ६ | ०० |
| ,, ए. मानवकर | दिमालगारी | ५ | ०० |
| ,, जी. मोहनदास | मुंबई | १० | ०० |
| ,, व्ही. के. अपोयया | रेवा | ५० | ०० |
| डॉ. पी. व्ही. पुस्तोमजी | नासिक | ६१ | ०० |
| श्री. जी. सी. साडवरते | अमरावती | ५० | ०० |
| ,, के. आनंदराव | धारवार | ५ | ०० |
| ,, एम्. वेलेलकर | मुंबई | ५ | ०० |
| ,, व्ही. श्रीनिवासम | येलोरे | ५४ | ०० |
| ,, बी. सींद | आवजोड | ११ | ०० |
| ,, टी. जी. पाटील | नांदेड | २० | ०० |
| ,, एम्. व्ही. माळू | मोहव | १० | ०० |
| ,, रामन | इंदोर | ६ | ०० |
| ,, एच. एम्. ठाकूर | जूनागोध | ५१ | ०० |
| ,, पी. सिंह | मुंबई | ६५ | ०० |
| ,, एस. पी. दंडवते | — | १ | ०० |
| ,, एल. डब्ल्यु कंपनी | मद्रास | ५० | ०० |
| ,, सी. आर. चिट्ठनजर | मालघाट | १६ | ०० |
| ,, आर. भागवमदा | कोलयान | ५० | ०० |
| ,, आर. एम्. बी. कुकडे | इंदोर | १०१ | ०० |
| ,, एम्. जी. वांदरे | वडनेर | १०१ | ०० |
| ,, पी. व्ही. रुस्तोमजी | नासिक | ७४ | ०० |
| ,, ए. जी. कोदाम | मुंबई | १०१ | ०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ,, | रामन | इंदोर | ६ | ०० |
| ,, | पी. यु. कुरेकर | वरोरा | १०० | ०० |
| ,, | बी. आर. वर्मा | रायपुर | १० | ०० |
| ,, | सी. एस. भास्कर | सालोनागकी | १०१ | ०० |
| ,, | एम्. के. पाटेल | मुंबई | ५० | ०० |
| ,, | एन्. आर. गिलानी | केलापुर | ५ | ०० |
| ,, | व्ही. एन्. पंडीत | 56 A. P. O. | १० | ०० |
| ,, | हानुमतराव | मुंबई | ५०० | ०० |
| ,, | बी. एस. कुलकर्णी | पुना | ५ | ०० |
| ,, | आर. जी. सातभाई | अ. नगर | १७ | ०० |
| | | | ४९२१ | ०० |


# जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा.** यासाठीं नियमित व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यासाठीं लागणारी उपकरणें म्हणजे डंबेल्स, लेझीम... यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितो. नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, बिकास केंद्रें यांना माल पुरवितो.



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स**, ८५ बापू खोटे स्ट्रीट, जोंभळी मोहोल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर—डी. एच्. साखरकर




## ( एप्रिल १९६५ )

चालू महिन्यांत भक्तांची गर्दी श्रींचे दर्शनार्थ सुट्टीमुळें व श्रीरामनवमी उत्सवामुळें अतोनात झाली होती. कांही कलाकारांनी श्रीपुढें हजेरी दिली ती :—

**कीर्तन**

ह. भ. प. सहादू दिगंबर माळी, बार्शि जि. सोलापूर
,, ,, वसंतबुवा पंडित, मु. शेंदुरणी ( जळगांव ) पू. खा.
,, ,, रामराव गोविंद पाटील, मु. पेठ ता. चिखली जि. बुलढाणा.
,, ,, छगन मारुती बारटके, पुणे कर्वेरोड, आयुर्वेद शाळा.
,, ,, अनंत दामोदर आठवले, आयुर्वेद शाळा प्रिन्सिपॉल पुणें.
,, ,, इंदिराबाई एकबोटे, पुणें

संस्थान गवई विठ्ठलराव मराठे यांचीं नेहमींप्रमाणें कीर्तनें झाली—

**गायन**

श्रीरामनवमी उत्सवांत एकुण वादन करणारे कलाकार ४३ झाले. त्यांत श्री. जगन्नाथबुवा सुरतकर, साकोरी श्री. जयश्री शेजवाडकर परेल मुंबई. श्रीशनेश्वर एकतारी भजनी मंडळ मुंबई. एकनाथ प्रासादिक भजनी मंडळ, मुंबई. इतकेच बाहेरील बाकी सर्व स्थानिक होते. श्री. कन्याकुमारी साकोरी आश्रम भजन.

**प्रवचन**

श्री. ह. भ. प. पांडुरंग राया भाटीकार प्रिन्सीपाल मॉडेल इंग्रजी हायस्कूल मु. मडगांव ( गोवा )

**लोकनाट्य**

श्री. दत्तोबा तांबे शिरोलीकर पुणें
श्री. खेडकर लोकनाट्य मंडळ पुणें

**मोठ्यांच्या भेटी**

डॉ. लच्याण डिस्ट्रीक्ट हेल्थ प. हेल्थ ऑफीसर अ. नगर
नामदार होमी तल्यारखान अन्नमंत्री महाराष्ट्र राज्य सचिवालय मुंबई.
मे. जे. एन्. मेहरा असि. ए. आय. जी. पी. स्टे. ट्रॅ. पोर्ट मुंबई

नामदार डी. एस. ऊर्फ बाळासाहेब देसाई, गृहमंत्री महाराष्ट्र राज्य सचिवालय मुंबई.
माननीय सी. पी. गोडसे साहेब चॅरिटी कमिशनर महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मे. बी. पी. दलाल, सेक्रेटरी लॉ ॲन्ड ज्युडीसीअरी महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मे. एस. राममूर्ती कलेक्टरसाहेब अहमदनगर.
मे. डी. डी. सुतवणी ॲडिशनल सेशनजज्ज अहमदनगर.
श्री. सोनारसाहेब डी. एस. पी. अहमदनगर.
डॉ. राव साहेब डेप्युटी डॉयरेक्टर मेमोरियल स्कीम नागपूर.
डॉ. असि. डायरेक्टर पब्लिक हेल्थ डिपार्टमेंट पुणे.

**शिर्डी येथील हवापाणी :** उन्हाळा कडक भासत आहे. बाकी रोगराइ कांहीं नाहीं.

---

# शिर्डी येथील श्रीरामनवमी उत्सव शके १८८७

संस्थान शिर्डी ता. कोपरगांव. जि. अहमदनगर. येथील श्रीरामनवमी उत्सव शके १८८७ मिति चैत्र शु. ८ रोज शुक्रवार पासून तीन दिवस चैत्र शु. १० रोज रविवार पर्यंत शिर्डी येथील श्रीसाईबाबा महाराज समाधि मंदिरांत साजरा झाला. उत्सवाकरितां मुंबई, पुणें, नागपूर वऱ्हाड, खानदेश, मराठवाडा नांदेड, परभणी औरंगाबाद, तसेंच आंध्रप्रांत, म्हैसूरप्रांत मद्रासप्रांत या ठिकाणाहून बरेच भक्तजन कुटुंबातील मंडळीसह मोठ्या संख्येने शिर्डीस आले होते, तसेच शिर्डीगांवचे आसपास दहावीस मैलाचे आतील गांवचे शेतकरी, कामगारवर्ग बहू संख्येने शिर्डीस आले होते. उत्सवाचा कार्यक्रम दिनांक ९ शुक्रवार प्रारंभ-या दिवशीं पहाटे श्रींचे फोटोची व साईसच्चरित्र ग्रंथाची मिरवणूक होऊन तीं श्रींचे. द्वारकामाईंत चांदीचे सिंव्हासनात स्थापना व सतत चोवीस तास श्रीसाईस चरित्र ग्रंथाचे अध्याय वाचन सुरूं झाले. त्यानंतर श्रींचे मंगलस्नान गायन भक्त जनांचे सामुदायीक अभिषेक पूजन. साईचा प्रसाद म्हणून कापडाची लिलाव पद्धतीनें विक्री. माध्यान आरती व तीर्थप्रसाद. दुपारी नेहमीचे अध्याय वाचन व श्री. ह. भ. अनंतराव आठवले पुणें, ४॥ ते ६॥ पर्यंत कीर्तन रात्रौ श्रींचे पालखींचीं गांवांतून मिरवणूक, गारूड भारूड नंतर नेहमीची ११ वाजतां शेजारती. दिनांक २० शनिवार रोजीं पहाटे श्रींचे द्वारकामाईंतील साईसच्चरित्र अध्याय वाचन समाप्त व फोटोची व साईसच्चरित्र ग्रंथाची मिरवणूक परत मंदिरांत आली. त्यानंतर गंगागोदावरीच्या कावडी कोपरगांवहून गोदावरीच्या जल भरून आणलेल्या कावडीची मिरवणूक व कावडीपूजन होऊन त्या श्रींचे समाधीवर अर्पण करण्यांत आल्या. त्यानंतर श्रींचे मंगलस्नान पुष्पार्पण, व भक्तांचे सामुदायिक अभिषेक पूजा.

नंतर ११ ते १२॥ पर्यंत पुण्याचे आयुर्वेदाचार्य श्री. ह. भ. प. अनंतराव आठवले यांचें श्रीराम जन्माचें कीर्तन, पाळणा, नंतर मध्यान्ह आरती, तीर्थप्रसाद, सायंकाळीं निशाणाची व श्रींचे रथाची मिरवणुक सायंकाळीं ६ ते ७॥ पर्यंत होऊन धुपारती झाली. रात्रौ गवई, कलाकार, यांची रात्रभर हजेरी ९॥ ते पहाटे ६ पर्यंत झाली. रात्रभर मंदिर दर्शनार्थ खुलें ठेवणेंत आलें होतें. रात्रौ ११ वाजतां संदल मिरवणूक व शोभेचें दारूकाम गांवाबाहेर शेतांत रात्रौ १२ वाजतां झाले. दि. ११ रविवार रोजीं नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त भक्तांच्या सामुदायिक पूजा अभिषेक प्रसाद कापड विक्री १०॥ ते १२॥ पर्यंत श्री. ह. भ. प. अनंतराव आठवले पुणें यांचें गोपाळ काला कीर्तन दहीहंडी ( प्रसाद ) माध्यान आरती तीर्थप्रसाद उत्सव समाप्त. रात्रौ साकुरी कन्या कुमारी यांचें भजन. उत्सवाकरितां मुद्दाम मांडव ध्वज पताका कमानी केळीचे खुंठ आंब्याची तोरणे विद्युत दिव्यांची रोषणाई भक्तांना थंडगार पिण्याचे पाण्याची सोय प्रत्येक इमारतीत करणेत आली होती. तसेंच भक्ताना उन्हाचा त्रास होऊं नये म्हणून बसणेसाठी भोजनासाठीं कीर्तनासाठीं भव्य मांडव घालणेत आले होते. तसेंच पोलीस बंदोबस्त चोऱ्यामाऱ्या होऊं नयेत म्हणून चोख ठेवणेत आला होता तसेंच आरोग्य खात्यातर्फे साफ सफाई प्रत्येक खोल्यांतून डी. डी. टी. फवारे मारून स्वच्छता ठेवणेत आली होती. तसेच पिणेचे पाण्यांतून औषध टाकून स्वच्छ ठेवणेंत आलें होतें. उत्सवांत भक्तांना पक्वानाचे जेवण देण्याची व्यवस्था भोजन गृहामार्फत, करणेत आली होती. तसेंच नोकर सेवेकरी पाहुणे सन्माननीय मंडळीस चहा फराळाची व्यवस्था उत्तम ठेवणेत आली होती. उत्सवाप्रित्यर्थ संस्थान कर्मचारी वर्गास एक दिवस पक्वान्नाचे भोजन भोजन, गृहामार्फत देणेत आले. सर्व व्यवस्था मे. सन्माननीय कोर्ट रिसीव्हर पोतनीस साहेब यांचें देखरेखीखालीं उत्तम रितीनें होत असे. उत्सवाची व्यवस्था उत्तम रितीनें ठेवणेचे श्रेय मे. सन्माननीय कोर्ट रिसीव्हर साहेब यानांच आहे.

## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | **श्रीसाईसच्चरित्र** | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७–०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४–५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३–७५ |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४–०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३–०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality** | | by Pradhan | १–०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu) | | १–०० |
| (८) | **श्री साईलीलामृत** | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २–०० |
| (९) | ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस–दिल्ली | २–५० |
| (१०) | **साईबाबा–अवतार व कार्य** | (मराठी) | श्री. धोंड | २–०० |
| (११) | **साईबाबांचे ४ अध्याय** | (मराठी) | श्री. दासगणू | ००–५० |
| (१२) | **सगुणोपासना** | (मराठी) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१३) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००–२५ |
| (१४) | **श्री रुद्राध्याय ११ वा** | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००–१२ |
| (१५) | **स्तवन–मंजरी** | (मराठी) | श्री. दासगणू | ००–१३ |
| (१६) | **श्री साई-सुमनांजली** | (मराठी १०८ नांवें) | | ००–०६ |
| (१७) | **कीर्तन पंचक** | (मराठी) | श्री. देव | १–५० |
| (१८) | **शीलधी** | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००–७५ |
| (१९) | **श्री साईगीतांजलि** | (मराठी) | कवि श्रीपाद | ००–१२ |
| (२०) | **Spiritual Symphony** | | by R. S. Harshid Mehta | २–५० |
| (२१) | **Side lights on Sai Baba** | (Eng.) | Calcutta | ००–७५ |
| (२२) | **Guide to Shirdi** | (English) | | ००–१२ |
| (२३) | **स्तवनमंजिरी व सुमनांजली** | (मराठी) | | ००–२० |

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 15" × 20" Thick | 1–00 |
| (2) | ,, ,, ,, 9½" × 13½" medium | 00–37 |
| (3) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00–50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां
प्रकाशक : डी. जी. पोतनीस, मुंबई १४.



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते, त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आ णि म्ह णू न च

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई
टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांचीं तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक : श. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : बी. जी. पोतनीस, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.